संपादकीय

पॉप्युलरचे 'कादंबरी आस्वाद शिबिर'

मराठी साहित्याच्या आस्वाद-आकलन प्रक्रियेला हातभार लावण्यासाठी अनेक उपक्रम विविध साहित्यसंस्था आणि माध्यमे यांच्या द्वारे सातत्याने चालू असतात. पुण्यामुंबईसारख्या शहरात वाङ्मयीन कार्यक्रमांची रेलचेल असते. त्याचप्रमाणे गावोगाव होणारी छोटीमोठी साहित्य संमेलने आणि चर्चा -परिसंवाद-व्याख्यानमाला यासारखे उपक्रमही वाङ्मयीन जाणीव जागृतीला पोषक ठरत असतात.

पॉप्युलर प्रकाशनने आपला सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त नाशिक येथे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या सहकार्याने साहित्य आस्वाद शिबिराचे आयोजन केले होते. दि. १० ते १५ मे पर्यंत चाललेल्या या सहा दिवसांच्या शिबिरात स्वातंत्र्योत्तर काळातील ३२ कादंबऱ्यांवर सखोल विचारमंथन करण्यात आले. महाराष्ट्राच्या सर्व भागातून आलेले पन्नास शिबिरार्थी आणि पंचवीसेक अभ्यासक, कादंबरीकार व समीक्षक यांच्या उपस्थितीने आणि सहभागाने हे आस्वाद शिबिर आगळेवेगळे ठरावे यात नवल नाही. या शिबिरासाठी निवडलेल्या सर्व कादंबऱ्यांवर नामवंत अभ्यासक-समीक्षांकडून आस्वादपर लेख मागवण्यात आलेले होते आणि त्याच्या प्रती सर्व शिबिरार्थींना किमान महिनाभर आधी मिळतील अशी व्यवस्था केलेली होती.

दुर्मिळ वा उपलब्ध असलेल्या कादंबऱ्यांच्या झेरॉक्स प्रतीही तयार ठेवून पुरवण्यात आल्या होत्या. शिबिरार्थींमध्ये तिशीतील तरुणांपासून पंचाहत्तरीतील ज्येष्ठांपर्यंत विविध व्यवसायातले जिज्ञासू पंधराशे रुपये निवासभोजनखर्च देऊन सामील झालेले होते. त्या सर्वांनी आस्वादासाठी निवडलेल्या कादंबऱ्या आणि त्यावरील आस्वादात्मक लेख वाचून यावे अशी अपेक्षा होती. सर्वच्या सर्व ३२ कादंबऱ्या वाचून आलेल्यांची संख्या अर्थातच कमी होती; पण किमान दहाबारा कादंबऱ्या एकेकाने वाचून शिबिरातला आपला सहभाग सार्थकी लावण्याचा मनोमन चंग बांधला होता. त्यामुळे अभ्यासक-समीक्षक-लेखक यांच्याबरोबरच्या चर्चा एकतर्फी न होता चांगल्या रंगत गेल्या; आणि अनेकदा तर आस्वादक लेख लिहिणाऱ्या लेखकांपेक्षा वेगळी मतेही चर्चेत मांडण्यात आली. एखाद्या कादंबरीकडे किती वेगवेगळ्या अंगांनी बघता येते; व्यावसायिक व अनुभवपातळीमधील भेद यामुळे त्या परिचयाच्या कलाकृतीकडेही काही जण वेगळ्या चष्म्यातून बघतात त्या कलाकृतीतून नवनवी आशयकेंद्रे शोधू शकतात; कलाकृतीला अधिक आशयघनता आणि अर्थवत्ता देऊ शकतात असेही लक्षात आले.

या आस्वादशिबिराचे उद्घाटन विख्यात कथाकार गंगाधर गाडगीळ याच्या हस्ते झाले. त्यांनी समीक्षकांच्या विश्लेषणात्मक प्रवृत्तीच्या अतिरेकावर आरंभीच हल्ला चढवला. विश्लेषणाच्या नादात आस्वादकता हरवून टाकणाऱ्या समीक्षेऐवजी रसिकतेने साहित्यकृतीचे आकलन होण्याच्या प्रक्रियेला अधिक महत्त्व आणि मोल आहे हे त्यांनी पुन:पुन्हा ठासून सांगितले.

पॉप्युलर प्रकाशनचे संचालक रामदास भटकळ यांनी या शिबिरामागची संकल्पना स्पष्ट करताना अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. लेखक लिहितो, त्या लेखनाची समीक्षा होते; पण त्या समीक्षेतून अनेक गोष्टी निसटतात; जागरूक व रसिक वाचक अशा निसटलेल्या गोष्टींचाही साक्षेपी मागोवा घेतात; आणि त्या कलाकृतीशी समरस होतात. ॲकॅडमिक समीक्षेच्या रूढ परिभाषेत ते अडकून बसत नाहीत. आपल्या आस्वादाचे निकष ते स्वत:च ठरवून स्वत:च्याच भाषेत मूल्यमापन करतात. लेखक-समीक्षक-प्राध्यापक या त्रिकूटापुरता ग्रंथ-आस्वाद-व्यवहार सीमित राहता कामा नये. वाचकालाही त्यात स्थान हवे. वाचकापर्यंत आस्वादाची प्रक्रिया पोचायला हवी म्हणून लेखक-समीक्षक-वाचक या सर्वांनी एकाच पातळीवर येऊन निवडलेल्या कादंबऱ्यांची सौंदर्यस्थळे आणि बलस्थाने शोधावी; आस्वादाची नवी परिमाणे आणि परिभाषा सिद्ध करावी; त्या दृष्टीने हे शिबिर म्हणजे एक प्रयोगशाळा ठरावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या शिबिरासाठी चंद्रकांत बांदिवडेकर, नागनाथ कोत्तापल्ले, रंगनाथ पठारे, राजन गवस, दिगंबर पाध्ये, चंद्रकांत वर्तक, पुष्पा राजापुरे, रेखा इनामदार, वसंत आबाजी डहाके वगैरे अभ्यासक-समीक्षक उपस्थित होते. त्यांनी आपली मते सांगितली तशीच उपस्थित शिबिरार्थींची मतेही जाणून घेतली. त्यामुळे आस्वाद प्रक्रियेतील निरनिराळ्या पैलूंना स्पर्श झाला. वेगवेगळ्या भूमिकांतून एकच कलाकृती कशी नानाविध रूपधारिणी बनून समोर येते याची झलक दिसली. वाचक-आस्वादकामुळे मूळ कलाकृतीला वेगळे परिमाण लाभते; आस्वाद प्रक्रियेनेच कलाकृतीला परिपूर्णता व अर्थवत्ता लाभते हे पुन:पुन्हा संबंधितांच्या मनावर ठसत राहिले. मान्यताप्राप्त समीक्षकांच्या चाकोरीबद्ध प्रतिक्रियांपेक्षाही वाचक-आस्वादकांच्या उत्स्फूर्त आणि अस्सल प्रतिक्रियांनी कलाकृतीचा जिवंतपणा जास्त चैतन्यमय होऊन समोर येतो याचा प्रत्यय आला. परस्पर चर्चांमधून अनेक वाङ्मयीन निकषांची सर्वांगीण चिकित्सा झाली; आणि अनेक लेबलांची चिरफाड होऊन मूळ कलाकृतीचे अंतरंगही खुले होण्यास मदत झाली.

पॉप्युलर प्रकाशनने आपल्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात समकालीन साहित्यावर एक परिसंवाद घेऊन, 'मराठी साहित्य: प्रेरणा व स्वरूप' हा ग्रंथ त्यातून सिद्ध केला होता. १९५०-१९७५ या पाव शतकातील मराठी साहित्याचा धावता आढावा घेणारा ग्रंथ म्हणून तो संदर्भदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरला. त्यासारखाच हा कादंबरी आस्वाद शिबिरातून सिद्ध झालेला ग्रंथही अभ्यासूंसाठी पथप्रदर्शक ठरेल. समकालीन साहित्याची सर्वांगीण चिकित्सा होण्याच्या दृष्टीने विद्यापीठे, प्रकाशन संस्था, साहित्य संस्था आणि ग्रंथालये वगैरेंनी एकत्र येऊन असे उपक्रम राबवण्याची गरज आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ आणि पॉप्युलर प्रकाशन या दोहोंचे या निमित्ताने खास अभिनंदन. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातर्फे मागे ग्रंथप्रकाशन व्यवहार कार्यशाळा घेण्यात आली होती. तिलाही उत्तम प्रतिसाद मिळाला होता. या विद्यापीठात अशा वाङ्मयीन कार्यक्रमांची रेलचेल व्हावी अशी विद्यापीठाच्या कुलगुरूंची इच्छा आहे. विविध साहित्य संस्थांच्या सहकार्याने ती इच्छा फलद्रूप होऊ शकेल. महाराष्ट्रातील सुजाण ग्रंथवाचन संस्कृतीच्या विकासाला त्यामुळे चांगली दिशा व गती मिळू शकेल.

-संपादक.

साहित्यवार्ता

लेखकांना घडविण्यातच आयुष्याचा राम गवसलेले पटवर्धन

राम पटवर्धन म्हणजे उत्तम संपादक आणि साहित्याचे मर्मज्ञ जाणकार व वाचक. माझ्या कथालेखनाच्या जडणघडणीचा जो काळ होता त्या काळात मला त्यांचे महत्त्वाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्याशी माझी सतत साहित्यचर्चा होत असे. एखादया व्य तीतला लेखक तींयांना समजला, कीते बरोबर त्याच्याकडून लेखन करवून घेत असत त्यांच्या मताला आणि चर्चेला माझ्या दृष्टीने खूप महत्त्व असे. मी 'वैदेही' नावाची एक कथा लिहिली होती. ती कथा खूप गाजली, हे सगळ्यांना माहिती आहे; परंतु त्या मागची खरी कथा अशी आहे, की जेव्हा मी ही कथा पटवर्धनांना वाचायला दिली तेव्हा ती वाचल्यावर ते मला म्हणाले, तुमच्यातला कथाकाराला जे मनापासून भावले आहे, ते तुम्हाला या कथेत प्रत्ययकारितेने मांडता आले नाही. मी ती कथा तशीच पडू दिली. दुसऱ्या वर्षी मी तीच कथा पूर्णपणे नव्या स्वरूपात लिहिली तेव्हा त्यांनी ती उत्तम असल्याचा अभिप्राय दिला आणि ती खूप गाजली. ते आपले मत स्पष्टपणे मांडत आणि त्याचबरोबर लेखकाचेही स्वातंत्र्य अबाधित राखीत असत. त्यांचा स्वभावच मनमोकळा आहे. स्वत: लिहिणारे खूप असतात; परंतु दुसऱ्यांना लिहिते करण्यात, त्यांच्याकडून चांगलं लिहून घेण्यात, त्यावर उत्तम संस्कार करण्यात आयुष्यभर आनंद मानणारा राम पटवर्धनांसारखा एखादाच साहित्यव्रती संपादक असतो.

–विजया राजाध्यक्ष (लोकमतवरून).

संघाभोवती विनाकारण गूढतेचे वलय : डॉ. यादव

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बहुतेक उपक्रम भविष्याचा वेध घेणारे आणि अर्थपूर्ण असतात, पण त्यांची कधीच जाहीर चर्चा होत नसल्याने संघाभोवती विनाकारण गूढतेचे वलय निर्माण झाले आहे. ही संघव्यवस्था अधिक बोलकी व्हावी, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी व्यक्त केले.

आस्वाद प्रकाशन आणि पुणे मराठी ग्रंथालय आयोजित कार्यक्रमात साप्ताहिक विवेकचे संपादक रमेश पतंगे लिखित अंगुस्तान ते लेखणी या पुस्तकाचे प्रकाशन झाले. दादासाहेब बेंद्रे अध्यक्षपदी होते.

डॉ. यादव म्हणाले, संघाकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहणारे अब्राह्मणी व्यक्तिमत्त्व असा रमेश पतंगे यांचा उल्लेख करावा लागेल. व्यक्तीच्या पक्षीय वा राजकीय भूमिकेपेक्षा सुजाण व्यक्तिगत भूमिकेला त्यांनी प्राधान्य दिले आहे. पतंगे यानी संघाच्या मर्यादा, आक्षेप यांचा अपारंपरिक पद्धतीने मागोवा घेतला प्रयत्न केला आहे. पतंगे यांच्या लेखणीला सुईप्रमाणे

अग्र आहे. शिंपी समाजातील असल्याने वाट्याला आलेली उपेक्षा, वाताहत, झगडा यांचे दर्शन या पुस्तकातून घडते. रमेश पतंगे म्हणाले, समाजातील जाती पुसून टाकण्याचे कार्य संघाच्या माध्यमातून डॉ. हेडगेवार यांनी केले. मात्र, संघकार्याची उघड चर्चा न झाल्याने संघाभोवती गूढतेचे वलय निर्माण झाले आहे.

संवाद संस्थेच्या वतीने घर तेथे ग्रंथालय योजना

मुलांमध्ये वाचनाची संस्कृती वाढीस लागावी; तसेच गरीब, गरजू मुलांना पुस्तके उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने संवाद संस्थेतर्फे घर तेथे ग्रंथालय ही योजना सुरू करण्यात येत आहे. त्या अंतर्गत गणेशनगर येथे सुरू होणाऱ्या भा. रा. भागवत बालमित्र वाचनालयाचे उद्घाटन १८ मे रोजी ज्येष्ठ बालसाहित्यकार लीलावती भागवत यांच्या हस्ते झाले.

या उपक्रमासाठी युवा सकाळ व नगरसेविका मेधा कुलकर्णी यांनी सहकार्य केले आहे. कर्वे रस्ता प्रभागातील चाळ क्रमांक १०, शनी मारुती मंदिराजवळ, गणेशनगर या ठिकाणी हे वाचनालय सुरू झाले आहे.

रॅम्बो सर्कसमध्ये पुस्तकांचे प्रकाशन

सर्कस विश्व आणि दि वर्ल्ड ऑफ सर्कस या दोन पुस्तकांचे प्रकाशन ५ मे रोजी रॅम्बो सर्कसमध्ये करण्यात आले. महापौर दीप्ती चौधरी ांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात सर्कसमध्ये विदुषकाचे काम करणाऱ्या कलाकारांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

श्री. प्रवीण वाळिंबे यांनी ही पुस्तके लिहिली असून, त्यांचा इंग्रजी अनुवाद ज्येष्ठ पत्रकार हॅरी डेव्हिड यांनी केला आहे. तनया-ईशा प्रकाशनतर्फे ही पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत. सर्कसचा इतिहास, कलाकारांचे जीवन, त्यांचे प्रश्न इत्यादी विषय या पुस्तकात हाताळले आहेत. रॅम्बो सर्कसचे सुजित, दिलीप आणि अजय छत्रे आदी या कार्यक्रमास उपस्थित होते.

मुक्तपणाने लिहिणाऱ्या महिलांचे कौतुक व्हावे : देवधर

मुक्तपणाने लिहिणाऱ्या महिलांच्या धीटपणाचे समाजाने कौतुक करायला हवे, अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक ज्योत्स्ना देवधर यांनी व्यक्त केली.

पिंपरी-चिंचवड अनुष्का स्त्री मंच आणि लायनेस लब ऑफ पुणे आनंद यांनी चिंचवडच्या चैतन्य सभागृहात आयोजित केलेल्या पहिल्या स्त्री साहित्य, कला संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी उद्योजिका जयश्री फिरोदिया होत्या. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, प्रा. सुप्रिया अत्रे, डॉ. पूजा यादव, गीता शर्मा या वेळी उपस्थित होत्या. संमेलनात परिसरातील सुमारे ३०० महिला सहभागी झाल्या होत्या.

श्रीमती देवधर म्हणाल्या: कष्ट करण्याची तयारी असेल, तर आपण काहीही करू शकतो. नेमके व सोप्या भाषेत समजेल असे लिहिले पाहिजे. मात्र, लिहिण्यापूर्वी विचार करावा. आजच्या महिला निर्भीडपणे लेखन करतात, ही बाब उल्लेखनीय आहे, त्यांच्या धीटपणाचे समाजाने कौतुक केले पाहिजे.

श्रीमती फिरोदिया म्हणाल्या: महिलांमध्ये चिकाटी, सहनशीलता, संवेदनक्षमता जास्त असते. त्याचा उपयोग व्यवसायात करावा.

नगरसेविका मंगला कदम यांनी जिद्द, कष्ट व एकाग्रता असली, की महिला यशस्वी होते, असे नमूद केले.

पुण्याचा इतिहास काही हजार वर्षे मागे जाण्याची श यता ?

पुण्याचा इतिहास इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकापासून सुरू होतो, असे पुरावे नुकतेच सापडले होते. आता थेऊरजवळ ताम्रपाषाणयुगीन वस्तूंचे अवशेष मिळाले आहेत. याचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास केल्यास पुण्यातही ताम्रपाषाणयुगाचे अवशेष मिळू शकतील. असे झाले तर पुण्याचा इतिहास आणखी काही हजार वर्षे मागे जाऊ शकेल, असे मत पुणे येथे झालेल्या परिसंवादात व्यक्त करण्यात आले.

श्री देवदेवेश्वर संस्थानतर्फे भरविण्यात आलेल्या 'प्राचीन पुणे : एक आंतरशाखीय संशोधन' या विषयावरील परिसंवादात डेक्कन महाविद्यालयाचे माजी सहसंचालक प्रा. शरद राजगुरू, डॉ. वसंत शिंदे, डॉ. प्रमोद जोगळेकर, डॉ. म. के. ढवळीकर, पांडुरंग बलकवडे, डॉ. वि. वि. पेशवा, पर्वती संस्थानचे प्रमुख विश्वस्त राम चव्हाण, बापूसाहेब जोशी आदी सहभागी झाले होते. पुण्याचा इतिहास पाषाणयुगानंतर म्हणजे केवळ सातव्या-आठव्या शतकापासून सुरू होतो, असा समज होता, असे नमूद करून डॉ. शिंदे म्हणाले, कसबा पेठेत नुकत्याच झालेल्या संशोधनाने हा दावा फोल ठरवला. येथे सापडलेली खापरे, बांगड्यांच्या अवशेषांवरील नक्षी सातवाहन काळातील म्हणजे इसवी सनपूर्व दुसऱ्या शतकातील आहे. यामुळे पुण्याचा इतिहास एक हजार वर्षे मागे गेला आहे.

जैवतंत्रज्ञान आणि पुरातत्त्वशास्त्र एकत्र आल्याने जीवाश्मांच्या संशोधनाला आणखी चालना मिळाली आहे, असे नमूद करून डॉ. जोगळेकर म्हणाले, प्राण्यांच्या अवशेषांचा अभ्यास करताना माणसाने कापलेले हाड आणि नैसर्गिकरीत्या तुटलेले हाड यात फरक करता येतो. यावरून प्राचीन काळात मनुष्याचे अस्तित्व किती काळापूर्वीपासून होते, याचा अंदाज करता येणे श य आहे.

नाशिकला वसंत कानेटकर यांचे स्मारक

प्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर यांचे स्मारक नाशिकजवळ सावरगाव रस्त्यावर उभारण्यात येणार आहे. मराठी रंगभूमी अनेक दशके गाजवणाऱ्या या नाटककाराच्या त्याच्याच गावात होणाऱ्या स्मारकाचे काम मात्र सध्या मंदावले आहे. वसंतविश्व या संस्थेतर्फे महापालिकेला या कामासाठी मदत करण्यात येणार आहे. सध्या येथील कुंपणाच्या भिंतीचे कामच सुरू आहे. दीड कोटी रुपये प्रस्तावित खर्च असलेल्या या पूर्ण कामापैकी मुख्य स्मारकास ७२ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. महापालिकेच्याच हद्दीत २२ एकर जागेवर बोटॅनिकल गार्डनच्या धर्तीवर हे वसंत उद्यान साकारणार आहे. या स्मारकाचे आव्हान पेलण्याचा निर्धार येथील धनंजय शिंदे या राष्ट्रीय पुरस्कारविजेत्या वास्तुविशारदाने केला आहे. शिंदे यांनी कानेटकरांच्या स्मारकाचा आराखडा बनविताना स्ट्रॅटसफर्ड (इंग्लंड) येथील शे सपिअरचे स्मारक डोळ्यासमोर ठेवले. वसंतविश्व या नावातील ऋतुराज वसंत व विश्वाची भव्यता या दोन्हींतील वैशिष्ट्ये स्मारकात प्रतिबिंबित व्हावीत, या दृष्टीने आराखडा बनवला आहे. वसंत उद्यानात विविध प्रकारचे वृक्ष लावण्यात येणार आहेत. २२ एकरांच्या मध्यभागी ११० फूट जागेवर सुंदर तळे बांधण्यात येणार आहे. वास्तूचा आकार झाडाच्या पानांप्रमाणेच असेल. वास्तूत प्रवेश केल्यावर सुरवातीच्या कक्षात माहिती केंद्र असेल. त्यात वसंत कानेटकर यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी संपूर्ण माहिती असेल. पाण्याखालून जाणाऱ्या छोट्या पायवाटेने स्मारकाच्या दुसऱ्या भागात जाता येईल. येथे कानेटकरांच्या शरणपूर रस्त्यावरील शिवाई

बंगल्यातील कानेटकरांच्या लेखनाच्या खोलीची प्रतिकृती उभारण्यात येणार आहे. सुरवातीच्या काळात कानेटकरांनी लेखनासाठी वापरलेली दौत येथे ठेवण्यात येईल. कानेटकरांचा स्वत:चा मोठा पुस्तक संग्रह होता. त्यांच्या नंतर हा संपूर्ण संग्रह स्मारकासाठी देण्याचा निर्णय त्यांचे नातू अंशुमन, मंत्री प्रशांत हिरे, प्रदीप सराफ, विवेक पाटणकर आदी वसंतविश्वच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे.

बालचित्रवाणी बंद पडणार ?

शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रम तयार करणाऱ्या बालचित्रवाणीला लवकरच टाळे लागणार अशी चिन्हे आहेत.

इयत्ता पहिली ते पाचवी आणि सातवी ते दहावीसाठी वर्षभरात सुमारे ३९०० मिनिटांचे कार्यक्रम करणाऱ्या या संस्थेला सुरवातीपासूनच कोणी वाली नव्हता आणि आता या संकटसमयी तर त्यांची अवस्था ना घरका ना घाटका अशी झाली आहे. राज्य सरकारने आपली तिजोरी रिकामी आहे असे कारण देऊन, बालचित्रवाणीला मदत करण्याचे नाकारले आहे.

ही परिस्थिती केवळ महाराष्ट्रातच आहे असे नव्हे तर बिहार, ओरिसा, आंद्र प्रदेश, गुजरात येथील बालचित्रवाणीही बंद पडण्याची श यत आहे.

शिक्षणाचेही व्यापारीकरण करण्याचे राज्य आणि केंद्र सरकारचे धोरण असल्यामुळे आणि शैक्षणिक कार्यक्रम हा पैसे मिळवून देणारा उद्योग नसल्यामुळे बालचित्रवाणीच्या कर्मचारी आणि अधिकारी यांच्यावर उतारवयात नोकरी शोधण्याचे वेळ येणार, हे नक्की झाले आहे.

माझ्या आभाळाखालची माणसे

प्रा. विलास पाटील यांनी माझ्या आभाळाखालची माणसे या अभिवाचनाच्या कार्यक्रमात निवृत्त पोलिस अधिकारी अरविंद इनामदार, ज्येष्ठ कवी सुरेश भट आणि मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे व्यक्तित्व उलगडून दाखवले. आशय सांस्कृतिक चे सचिव वीरेंद्र चित्राव यांनी प्रास्ताविक केले.

अरविंद इनामदारांचा पक्षीनिरीक्षणाचा छंद, स्वयंपाकघरापर्यंत पोचणारी त्यांची मैत्री, भ्रष्टाचाराविषयी असलेला राग, माणसे जोडण्याबरोबरच कायम राखलेला दरारा, कडक शिस्तीला असलेली नैतिकतेची झालर असे काही पैलू त्यांनी उलगडून दाखवले. सुरेश भटांचे रंग माझा वेगळा हाती पडले आणि जखमेवर फुंकर मारल्यासारखी त्यांची कविता आनंद देऊन गेली. असे सांगतानाच भटांची खाण्याची लहर, त्यांचा विक्षिप्तपणा यांचाही पट उलगडला. अतिशय गरिबीतून वर आलेला, अपयश लवकर विसरून नव्याने उभा राहणारा एक सामान्य मुलगा पट्टेवाला ते मुख्यमंत्री हा प्रवास करतो आणि त्याचे आपण साक्षीदार असतो, हा अनुभव त्यांनी उभा केला.

पाध्ये विश्वस्त निधीतर्फे पुरस्कारांचे वितरण

प्रभाकर पाध्ये व कमल पाध्ये विश्वस्त निधी आणि प्रशांत पाध्ये शैक्षणिक व सांस्कृतिक सार्वजनकि विश्वस्त निधी यांच्या वतीने शैक्षणिक, सांस्कृतिक सार्वजनिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार दिले जातात. यंदाचा महिला गोरव पुरस्कार मॅझिन बर्नसन (फलटण) आणि डॉ. दिप्ती देवबागकर यांना देण्यात आला. अनुक्रमे २५ हजार आणि १५ हजार रुपये असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. पन्नास हजार रुपयांचे साह्य डॉ. राणी बग यांच्या

संस्थेला देण्यात आले. मौज प्रकाशन गृहाला प्रभाकर पाध्ये यांच्या सौंदर्यानुभव आणि मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा या पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या काढण्यासाठी साठ हजार रुपयांचे अर्थसाह्य दिले गेले. ज्येष्ठ पत्रकार मुकुंदराव किर्लोस्कर अध्यक्षस्थानी होते.

आळशी तत्त्वज्ञान झटकून भाषांतर करा : नेमाडे

इंग्रजीतून ज्ञान मिळत असल्याने भाषांतराची गरज नाही हे आळशी तत्त्वज्ञान झटकून दिले पाहिजे आणि जगातील नवे ज्ञान भाषांतराच्या माध्यमातून मातृभाषेत आणायला हवे. वसाहतवाद नाहीसा करणारे भाषांतर हे एक मोठे शस्त्र आहे. असे मत ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी व्यक्त केले.

केल्याने भाषांतर त्रैमासिक, सृष्टी सांस्कृतिक आणि विकास प्रतिष्ठान व राज्य मराठी विकास संस्था यांनी नेहरू सेंटरच्या सहकार्याने आयोजित केलेल्या पहिल्या भाषांतरकारांच्या संमेलनाचे उद्‌घाटन नेहरू सेंटरचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ कवी दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचे हस्ते केल्याने भाषांतर या नियतकालिकाचा अंक प्रकाशित करण्यात आला. आपण तुटपुंज्या ज्ञानाच्या आधारावर जगाकडे पाहत आहोत. याकडे लक्ष वेधत ते म्हणाले, जगातील ७३ टक्के ज्ञान इंग्रजी, फ्रेंच, जर्मन व रशियन या चार भाषांमध्ये असते. उर्वरित २७ टक्के ज्ञान जगातील अन्य भाषांमध्ये असते. म्हणजे आपल्यापर्यंत येणारे ज्ञान हे बारा-तेरा टक्केच असते. या तुटपुंज्या ज्ञानाच्या आधारे जगाकडे पाहणारी आपली दृष्टी तोकडी असते. भाषांतरांतून नवी रूपे, नवी बीजे येतात आणि आपली भाषा, दृष्टी विस्तारते. वेगवेगळ्या भाषांमधून थेट भाषांतर करणारे छोटे-मोठे गट मराठीत वाढायला हवेत.

मातृभाषेला पर्याय असूच शकत नाही. असे त्यांनी सांगितले. यापुढच्या काळात एकच एक भाषा येणारा अडाणी ठरेल; पण मातृभाषा न येणारा जास्त अडाणी ठरेल. केवळ वसाहतवादी देशांतच मातृभाषेला अन्य भाषांचा पर्याय दिला जातो. ही वसाहतवादी मानसिकता बदलायला हवी. महाराष्ट्रातील भाषांतरकारांची सूची तयार केली जावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

श्री. शरद पवार म्हणाले, कोणतेही ज्ञान, विचार एका भाषेपुरता मर्यादित आणि बंदिस्त राहता कामा नये. आता पुढे जाण्यासाठी, स्वत:ला ज्ञानसंपन्न, विश्वसंचारी करण्यामध्ये भाषांतराला मोठे कार्य करावे लागेल. भाषांतराची क्रिया अधिक वेगवान व्हावी असा हा काळ आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात जागतिकीकरणाची परिणामकारक प्रक्रिया अत्यंत वेगाने, पण सूक्ष्मपणे घडते आहे, त्या तुलनेत भाषांतराचा वेग वाढलेला दिसत नाही.

ज्ञानेश्वर हे मराठीतील आद्य भाषांतरकार-भाष्यकार होते, असे त्यांनी सांगितले. मराठीतील भाषांतराच्या परंपरेचाही त्यांची थोड यात आढावा घेतला. ते म्हणाले, भाषांतर ही जग जोडणारी अत्यंत संवेदनशील व्यवस्था आहे. साने गुरुजींची आंतरभारतीची कल्पना ही देश जोडणारी होती, तशीच भाषांतर ही विश्वातल्या मानवांना एकात्म करणारी शक्ती आहे. त्या भाषेतील मूळ कृतीच वाटेल अशा डौलाने साहित्यकृतीचे भाषांतर झाले पाहिजे.

विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांच्या भाषाविषयक लवचिक धोरणांवर भाषांतरविद्येचा विकास अवलंबून आहे. मराठी भाषेत ज्ञान-विकासाचे सगळे आधुनिक प्रवाह खळाळते ठेवण्यासाठी व वैश्विक ज्ञानाची समकाल देवघेव होण्यासाठी भाषांतराचाच मार्ग अनुसरावा लागेल.

मिलिंद बोकील यांना कोठावळे पुरस्कार

''कोणत्याही क्षेत्रात प्रवाहाला मुरड घालीत त्यात चांगला बदल घडवून आणला जातो, तेथे मानवी सर्जनशीलता दिसते. या सर्जक प्रयत्नांचा शोध घेण्याची उत्सुकता माझ्या मनात कायम असते.'' असे कथालेखक मिलिंद बोकील यांनी सांगितले.

मॅजेस्टिक प्रकाशनतर्फे ज्येष्ठ विचारवंत स. ह. देशपांडे यांच्या हस्ते श्री. बोकील यांना 'समुद्रापारचे समाज' या पुस्तकाबद्दल 'केशवराव कोठावळे पुरस्कार' देण्यात आला. 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित प्रमुख वक्ते होते.

श्री दीक्षित म्हणाले, ''बोकिलांनी मध्यमवर्गीयांच्या मर्यादांपलीकडे जात माणसांचा शोध घेणारे लेखन केले आहे. ते प्रवासवर्णन या चौकटीत बसवता येणार नाही. ज्याला समाजाविषयी आस्था असेल व आसपासच्या गोष्टींना जो जागरूक प्रतिसाद देत असेल, त्याला हे लेखन नेहमी साद घालत राहील.''

परीक्षक समितीच्या वतीने दीपक घारे यांचे भाषण झाले. अशोक कोठावळे यांनी स्वागत केले.

राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शन

'बॉम्बे बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स असोसिएशन'च्या राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शनात १५० प्रकाशक-वितरकांचा सहभाग होता.

राष्ट्रीय पुस्तक प्रदर्शन हे 'व्यापारी स्वरूपाचं' नसलं पाहिजे, अशी अट महसूल अधिकाऱ्यांनी घातल्यामुळे यंदा प्रदर्शनाला तिकिट नव्हते. मोफत प्रवेशामुळे यंदा प्रतिसाद जास्त मिळाला.

चर्चगेटच्या क्रॉस मैदानात भरलेल्या या प्रदर्शनाचं उद्‌घाटन १६मे रोजी विधानसभेचे अध्यक्ष अरुण गुजराथी यांच्या हस्ते झालं. २४ मे रोजी महाविद्यालयीन ग्रंथपालांचा मेळावा प्रदर्शनस्थळी घेण्यात आला.

हमखास खपणाऱ्या विषयांची (मॅनेजमेंट, कॉम्प्युटर, इंजीनिअरिंग, मार्केटिंग आणि बालसाहित्य) इंग्रजीतली पुस्तकं, गंभीर स्वरूपाचं हिन्दी साहित्य, उर्दू, गुजराती, आदी भाषांतले दोनतीन प्रकाशक असं प्रदर्शनाचं स्वरूप होतं. मराठी प्रकाशकांपैकी 'लोकवाङ्मय गृह', 'राजहंस', 'पॉप्युलर', 'केशव भिकाजी ढवळे' आणि 'ज्योत्स्ना प्रकाशन' यांचे स्टॉल होते. शिवाय 'जीवनदीप', 'नवनीत', 'ओरिएंट लाँगमन' अशा प्रकाशकांच्या स्टॉलवरही मराठी पुस्तकं होती.

एरवी कुठं पाहायला न मिळणारी मराठी (आणि अन्य भाषांतली) पुस्तकं 'साहित्य अकादमी,' 'प्रकाशन विभाग', 'नेहरू बाल पुस्तकालय' यांच्या स्टॉलवर पाहायला मिळाली. 'संगीत कार्यालय' किंवा 'वर्ल्ड बँक', इंडिया मॅप सर्व्हिस' असे काही, विशिष्ट क्षेत्रात रस असलेल्यांसाठी पर्वणी ठरणारे स्टॉलही होते.

माहितीयुगाचे भान न ठेवता आजच्या लेखिका लिहितात

''आजच्या स्त्रीलेखका माहितीतंत्रज्ञानयुगाचे भान ठेवून लेखन करीत नाहीत.'' अशी खंत लेखिका डॉ. लीला दीक्षित यांनी व्यक्त केली.

वसंत व्याख्यानमालेत गिरिजा साठे स्मृती व्याख्यानात स्त्री साहित्याचा मागोवा या विषयावरील परिसंवादात त्या बोलत होत्या.

भारती पांडे, डॉ. कल्याणी दिवेकर, मंजिरी ताम्हनकर यांनी परिसंवादात भाग घेतला. साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या स्त्री साहिज्याचा मागोवा या ग्रंथाच्या अनुषंगाने या परिसंवादात चर्चा झाली.

डॉ. दीक्षित म्हणाल्या, ''१८५० नंतर संतसाहित्य व लोकसाहित्यामध्ये प्रथम स्त्रियांनी आपली नाममुद्रा उमटविली. या काळात स्त्री पेक्षा माणूस म्हणून जगण्याचे आत्मभान निर्माण करून देणाऱ्या कविता स्त्रियांनी लिहिल्या. कविता, कथा, कादंबऱ्या, आदी वाङमयीन क्षेत्रात त्यांनी समर्थपणे लिखाण केले. मात्र सई परांजपे वगळता कोणत्याही लेखिकेने नाट्यक्षेत्रात लेखन केले नाही.''

स्त्रीसाहित्याची उपेक्षा दूर करण्याचे काम या ग्रंथाच्या माध्यमातून होत आहे. असे सांगून डॉ. दिवेकर म्हणाल्या, ''या साहित्यामधून आयुष्याकडे पाहण्याचा स्त्रीचा दृष्टिकोन दिसून येतो. या ग्रंथामध्ये समाजातील सर्व स्तरातील व जातिधर्मातील स्त्रियांच्या साहित्याचा मागोवा घेतला आहे. आता आदिवासी स्त्रियांचे साहित्य पुढे येत आहे. त्यांच्या साहित्यामधून वेगळा संघर्ष समोर येत आहे.''

बुद्धिप्रामाण्यवादापर्यंत विचारधारांचा अभावानेच प्रवास

''महाराष्ट्रात विविध प्रकारच्या विचारधारा, परंपरा असल्या, तरी त्या बुद्धिप्रामाण्यवादापर्यंत अभावानेच जातात, असे मत डॉ. गंगाधर पानतावणे यांनी व्यक्त केले.

डॉ. पानतावणे यांना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे नुकतीच गौरववृत्ती देण्यात आली. नवोदित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी व रौप्यमहोत्सवी मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीही त्यांची निवड झाली आहे. त्यानिमित्त दलित साहित्य परिषद व बहिणाबाई प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ विचारवंत डॉ. मा. प. मंगुडकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी बहिणाबाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. वसंतराव पाटील अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पानतावणे म्हणाले, ''आम्ही संस्थात्मक जीवनातील मूल्ये डॉ. आंबेडकरांच्या विचारातून शिकलो. त्यातून परिवर्तनाची संस्थात्मकता, मूल्यात्मकता जपण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अनेक वेळा संघर्षही करावा लागला.''

'स्टुपिड व्हाईट मेन'ची बढिया कहानी!

ऑस्कर पुरस्कार स्वीकारताना अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या युद्धखोरींवर निर्भीडपणे खरमरीत टीका करणाऱ्या मायकेल मूर यांच्या 'स्टुपिड व्हाईट मॅन' या पुस्तकाने अमेरिकेतील बुद्धिजीवींमध्ये वादळ उठविले आहे.

बुश यांच्या धोरणांना जगातील कोणीही विरोध केल्यास त्यांच्यावर अमेरिकेचा शत्रू असल्याचा शिक्का मारण्याचा सपाटाच बुश व त्यांच्या समर्थकांनी लावला आहे. शिवाय रिपब्लिकन, अमेरिकी नागरिक, बुद्धिवंत, पत्रकार यांच्यामधूनही कोणी विरोध केल्यास त्याला देशद्रोही ठरवून त्याच्यावर सांस्कृतिक बहिष्कार टाकण्याचे तंत्र अवलंबिले असल्याचे अनेक अमेरिकी बुद्धिवाद्यांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर 'हार्पर कॉलिन्स' या नामवंत

प्रकाशन संस्थेने मूर यांचे पुस्तक प्रकाशित केल्याने व त्यात अमेरिकी साम्राज्यवाद, गोऱ्यांचा रंगभेद, तिसऱ्या जगातील गरीब देशांचे शोषण आदींवर खुसखुशीत टीका केल्याने जोरदार चर्चा सुरू आहे. या पुस्तकांच्या प्रकाशनाची कहाणीही रंजक आहे. ११ सप्टेंबरच्या हल्ल्याच्या एक दिवस आधीच मूर यांनी या पुस्तकाचे हस्तलिखित प्रकाशन संस्थेला दिले होते. ११ सप्टेंबरची घटना घडल्यानंतर मूर यांचे लिखाण छापण्यास 'हार्पर कॉलिन्स' ने चक्क नकार दिला. अमेरिकी साम्राज्यवाद व गोऱ्या माणसांविषयी लिहिलेली आपली मते थोडी सौम्य केली तरच हे लिखाण छापण्यात येईल, असे त्यांनी मूर यांना कळविले. मात्र मूर यांनी त्याला नकार दिला. पुढे न्यू जर्सी येथील एका कार्यक्रमात बोलताना ही गोष्ट मूर यांनी आपल्या भाषणात मांडली. हे भाषण ऐकणाऱ्या एका ग्रंथपालाने त्यांच्याकडे याबाबत चौकशी केली आणि त्या ग्रंथपालाने केलेल्या अनोख्या चळवळीने हे पुस्तक रूपर्ट मरडॉक यांची मालकी असलेल्या हार्पर कॉलिन्सला छापावे लागले.

या ग्रंथपालाने अमेरिकेतील हजारो ग्रंथपालांना या पुस्तकाविषयी व ते न छापण्याच्या प्रकाशन संस्थेच्या निर्णयाविषयी ई-मेलने माहिती दिली. ग्रंथपालांनी या पुस्तकाची मागणी हार्पर कॉलिन्सकडे नोंदविली. हा प्रकार लक्षात न आल्याने हार्पर कॉलिन्स यांनी मूर यांच्याकडे चौकशी केली, तर त्यांनाही या प्रकाराची माहिती नव्हती. अखेर सगळा प्रकार लक्षात आल्यावर मागणीच्या दबावापुढे बेगडी देशप्रेमाला नमावे लागले व हे पुस्तक प्रकाशित झाले. प्रकाशित झाल्याझाल्याच त्याच्या लाखो प्रती संपल्या.

या पुस्तकाची अमेरिकेत जी समीक्षा झाली तिच्यामध्येही एक विसंगती आहे. काहींना त्याला एकदम अतिउत्कृष्ट करून टाकले तर उरलेल्यांनी त्याची गणना एकदम टाकाऊमध्ये केली. मात्र आपल्या पुस्तकाची नि:पक्षपाती समीक्षा अजून झाली नसल्याची खंत स्वत: मूर यांना आहे. मुंबईतील क्रॉसरोड, ऑक्सफर्ड लोटस बुक हाऊस आदी प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे हे पुस्तक उपलब्ध आहे.

'मालिकांची अफूची गोळी प्रेक्षकांनीच नाकारावी'

समारंभात घालू तशा चकचकीत साड्या घालून झोपी जाणाऱ्या बायका, विवाहबाह्य संबंध असल्या गोष्टी दाखवणाऱ्या आणि अनावश्यक लांबवलेल्या सास-बहूच्या मालिकांची अफूची गोळी घेणार नाही, असा आवाज आता प्रेक्षकांनीच उठवायला हवा, अशी मागणी दूरदर्शनच्या निर्मात्या नीना राऊत यांनी केली.

वसंत व्याख्यानमालेमध्ये दूरदर्शन व वाहिन्यांवरील मालिकांबाबतच्या परिसंवादात झी अल्फा वाहिनीचे नितीन वैद्य, निर्माते दिग्दर्शक राकेश सारंग, प्रेक्षकांचे प्रतिनिधी म्हणून चंद्रमोहन कुलकर्णी सहभागी झाले होते. राजू परुळेकर यांनी सूत्रसंचालन केले.

मालिका बनवताना प्रेक्षकांना गृहीत धरलं जातं, पण हा प्रेक्षकांचाच दोष आहे असे मत व्यक्त करून राऊत म्हणाल्या की, त्यामुळेच मराठी प्रेक्षक सुबुद्ध आहेत. त्यामुळे असल्या अफूची गोळी असलेल्या मालिका आम्ही बघणार नाही, असे सांगून त्याविरुद्ध प्रेक्षकांनीच आवाज उठवायला हवा. मूळामध्ये मालिकेला मिळणारा प्रतिसाद टीआरपी नावाच्या कुणालाच न उमगलेल्या गोष्टीवर ठरवला जातो आणि त्यामुळे टीआरपी वगैरेऐवजी कल्पकता, चिकाटी, सातत्य आणि नवनव्या रूपात कार्यक्रम निर्मिती केल्यास प्रेक्षक नक्कीच प्रतिसाद देतील.

जाहिरातीसह सर्व पातळ्यांवर मराठीचा प्रभाव वाढवायला हवा, अशी अपेक्षा वैद्य यांनी व्यक्त केली. सर्वच वाहिन्यांसाठी १४ जुलैपासून पैसे मोजावे लागणार आहेत. मराठी मालिकांचे भवितव्य उज्वल असून लोक त्या बघतील, असा विश्वासही व्यक्त केला.

जुन्या पिढीतील दिग्गजांची आत्मकथने खरी नाहीत !

आचार्य अत्रे, ना. सी. फडके, व्ही. शांताराम या जुन्या पिढीतील दिग्गजांची आत्मकथने खरीखुरी नाहीतच, असे प्रतिपादन ७६ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. सुभाष भेंडे यांनी मिरज येथे केले. ते मिरज विद्यार्थी संघाच्या वसंत व्याख्यानमालेत 'मराठी साहित्यातील आत्मकथने' या विषयावर बोलत होते.

प्रा. भेंडे पुढे म्हणाले की, तसे पाहता आत्मकथन हे मराठी साहित्यातील आवडते साहित्य बनले आहे. तथापि आत्मप्रौढी व आत्मसमर्थनासाठी आत्मकथन लिहिण्याची प्रथा सुरू झाल्याने आत्मकथनातील वास्तवच हरवले आहे. ना.सी.फडके यांनी 'माझे जीवन एक कादंबरी' हे आत्मकथन लिहिले, पण त्यात आपल्या पहिल्या पत्नीविषयी काहीही उल्लेख केलेला नाही. आचार्य अत्रे यांनी 'कऱ्हेचे पाणी' लिहिले. त्यात जीवनातील बऱ्याच घटना लपवून ठेवल्या आहेत, त्यांच्या जीवनात एक स्त्री येऊन गेली पण त्या विषयी त्यांनी काहीच लिहिले नाही. व्ही. शांताराम यांनीही बऱ्याच गोष्टी उघड असताना लपविल्या, संगीतकार वसंत देसाई यांच्याविषयी फक्त ओझरती वाक्ये लिहिली.

विसाव्या शतकातील आत्मकथनाचे उत्तम उदाहरण म्हणजे लक्ष्मीबाई टिळक यांची स्मृतिचित्रे. हे आत्मकथन सर्वात लोकप्रिय झाले, असे सांगून प्रा.भेंडे म्हणाले की, लीला चिटणीस, हंसा वाडकर, दुर्गा खोटे यांनी कोणताही आडपडदा न ठेवता प्रांजळपणे आपली आत्मकथने लिहिली. स्त्रियांची आत्मकथने ही पुरुषांपेक्षा जास्त परखड व वास्तववादी असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर व साहित्यिका प्रा. कमल देसाई यांचा अमृत महोत्सवानिमित्त यावेळी सत्कार करण्यात आला.

हे दस्तऐवज वाचवता येतील का ?

पेशवेकालीन दस्तऐवजांचे कम्प्यूटर आणि स्कॅनरच्या साह्याने पुनर्लेखन करण्याचे काम पुण्याच्या पुराभिलेख (दफ्तरखाना) विभागाने हाती घेतले आहे. मोडी लिपीतील सुमारे चार कोटी दस्तऐवजांचे पुनर्लेखन होणार आहे. यातील बहुसंख्य कागदपत्रं वतनासंबंधी असून, पेशवे आणि शिवाजीमहाराजांनी कोणाला आणि कशी वतने दिली याबाबतची माहिती त्यात आहे. या उपक्रमासाठी राज्य सरकारने अनुदान मंजूर केले आहे. पुणे स्टेशन परिसरातील हा पुराभिलेख विभाग १११ वर्षे जुना असून, हे सर्व दस्तऐवज ३९००० रुमालांमध्ये बांधून ठेवले आहेत. ही कागदपत्रे जीर्ण होत असल्यामुळे आधुनिक उपकरणांच्या साह्याने त्याचे पुनर्लेखन आणि जतन करणे आवश्यक असल्याचे मत संचालकांनी व्यक्त केले आहे. आजपर्यंत काही रसायनांच्या साह्याने ती टिकवण्यात आली आहेत. पण त्याचेही डिजिटलाझेशन करणे आवश्यक आहे.

सी. डॅकने यासाठी खास कम्प्यूटर तयार करून दिले असून, येथील कर्मचाऱ्यांना ते कसे वापरायचे याचे प्रशिक्षणही दिले आहे;

अर्थपूर्ण नि:शब्दतेची नाटककाराला जाणीव असावी

नाट्यलेखनात शब्दांचा किमान वापर करताना नि:शब्दता व विरामही किती अर्थपूर्ण असू शकतात, हे नाटककाराला ठाऊक असायला हवे, असे विचार प्रसिद्ध नाटककार प्रा. महेश एलकुंचवार यांनी मांडले.

साहित्य अकादमी व इंडिया इंटरनॅशनल सेंटरने आयोजित केलेल्या लेखक भेटीच्या कार्यक्रमात प्रा. एलकुंचवार बोलत होते. नाटककार म्हणून ३८ वर्षांच्या दीर्घ कारकीर्दीचा आपण आनंद लुटला, म्हणून समाधान व्यक्त करून ते म्हणाले की, लेखक म्हणून मी माझ्याच भाषेच्या प्रेमात पडलो होतो. पण शब्दांच्या बाबतीत अत्यंत काटकसरी व निर्दयी असावे लागते, हे पहिले सत्र नाट्य दिग्दर्शिका डॉ. विजया मेहतांनी माझ्या गळी उतरविले. विजयाबाईंसोबत माझ्या एकांकिकांच्या तालमी बघितल्यानंतर अनावश्यक वाक्ये गळू लागली. रंगमंचावर वाक्यांची उधळपट्टी परवडणारी नसतेच. लेखक म्हणून जेव्हा मी रंगमंचाचा आराखडा काढून, त्यात रंगीत पेन्सिलने आपली पात्रे रंगवून इंचन्इंच जागेचा वापर करू लागलो त्यावेळी शब्दांच्या चपखल रचनेची आवश्यकता पटू लागली. नाटक लिहिताना लेखकाला दृक् व श्राव्य पैलूंचा कधीच विसर पडायला नको. लिहिलेले वाक्य संवादासारखे वाटायला हवे. नाटकातील संवाद कृत्रिम असला तरी तो नैसर्गिक भासला पाहिजे. काळजीपूर्वक तालमी बघितल्यानंतर आपल्या भाषेच्या प्रेमातून मी बाहेर पडलो.

आपण नाटकांकडे अपघातानेच वळलो, असे नमूद करून प्रा. एलकुंचवार म्हणाले, मी नाट्यलेखनाचे धडे गिरवलेले नव्हते वा माझी तशी पार्श्वभूमीही नव्हती. माझ्यावर त्यादृष्टीने कुठलेही संस्कार झाले नव्हते. त्यामुळे प्रारंभीच्या काळात माझ्या हातून अनेक चुका घडल्या. पण माझ्यासाठी तो आत्मशोधाचा कालखंड होता. स्वत:शीच झगडून, टीकाकार बनून मी आपल्याला घडविले.

साहित्य परिषदेला पाच लाखांची देणगी

श्रीमती पुष्पलता रानडे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अतिथी निवासाच्या आधुनिकीकरणासाठी पाच लाख रुपयांची देणगी देण्याचा संकल्प जाहीर केला आहे. गुढी पाडव्याचे औचित्य साधून दोन लाख रुपयांचा पहिला हप्ता महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष राजेन्द्र बनहट्टी यांच्याकडे देण्यात आला.

'कान्हदेशची लोकधारा' द्वारे खान्देशी संस्कृतीची ओळख

खान्देशातील पारंपरिक संस्कृती दर्शन घडवणाऱ्या कार्यक्रमात खान्देशाची सांस्कृतिक परंपरा, सणवार, जुन्या काळातील सामान्य गावकऱ्याचं जीवन दिसून येते. खान्देशच्या निसर्गकन्या बहिणाबाई चौधरी यांच्या सोप्या मधुर गीताने कार्यक्रमाची लज्जत अधिक वाढते.

निवेदन बहिणाबाईंच्या भूमिकेतून प्रा. कमल पाटील यांनी केले. बहिणाबाईंची ओवी, भजन, पालखीगीते, मायेराला जायचं, आखाती आली ही गीते विशेष श्रवणीय आहेत.

ज्ञानेश्वरीत नावीन्याचा आशीर्वाद : शेवाळकर

ज्ञानेश्वरांच्या काव्यात नित्य नावीन्याचा आशीर्वाद आहे, असे प्रा. राम शेवाळकर यांनी सांगितले. श्रीराधादामोदर प्रतिष्ठानतर्फे स्वामी वरदानंदस्वामी पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त आयोजित 'ज्ञानेश्वरांचा चिद्विलास' या व्याख्यानात प्रा. शेवाळकर बोलत होते. आनंदाने,

सौंदर्याने जगण्याची प्रेरणा ज्ञानेश्वरांनी दिली आहे. विश्वाचं सौंदर्य ज्ञानेश्वरांनी शब्दबद्ध केले आहे. ज्ञानेश्वरांनी ऐन विशीत लिहिलेल्या ज्ञानेश्वरीचा अभ्यास करण्यास आयुष्य अपुरे पडते, असे ते म्हणाले. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान चिरंतन आहे. त्यातील फुलांचा गंध, टवटवीतपणा अजूनही कायम आहे, असे प्रा. शेवाळकर यांनी सांगितले.

इलेक्ट्रॉनिक वृत्तपत्र!

इंटरनेटवर उपलब्ध होणाऱ्या वृत्तपत्रांच्या आवृत्या तासातासाला नव्या बातम्या देत असतात; पण आपल्या घरी येणारं वृत्तपत्र दररोज नवं विकत न घेता इंटरनेट आवृत्तीसारखं दररोज 'अपडेट' करून घेता आलं तर? काही अमेरिकी संशोधकांचा त्यासाठी प्रयत्न सुरू आहे. सहज गुंडाळून ठेवता येऊ शकेल, असा अतिशय पातळ 'इलेक्ट्रॉनिक इंक डिस्प्ले स्क्रीन' त्यांनी नुकताच तयार केला आहे. अवघी तीन दशांश मिलिमीटर जाडी असलेल्या या पडद्याची चार मिलीमीटर व्यासाची गुंडाळी करून ठेवता येऊ शकते आणि पूर्ण उलगडल्यावर तो कोणत्याही कोनातून सहजपणे पाहता येऊ शकतो, हे त्याचे वैशिष्ट्य.

अमेरिकेतल्या मॅसॅच्युसेटस राज्यातल्या केंब्रिज येथील इ-इंक कॉर्पोरेशनमधील यू चेन यांनी हा स्क्रीन तयार केला आहे. सध्या उपलब्ध इलेक्ट्रॉनिक स्क्रीनमध्ये हा स्क्रीन सर्वोत्तम आहे. मात्र इ-वृत्तपत्रासाठी अद्याप बराच मोठा पल्ला गाठावा लागेल. व्हिडीओ स्क्रीनप्रमाणे वापर करता येऊ शकतील असे कपडे याच तंत्रानं तयार करणंही शक्य आहे. मात्र त्यासाठी या पडद्यावरील विद्युतभार १५ मिलिसेकंदाच्या अंतरानं बदलला जाणं आवश्यक आहे असंही चेन यांनी सांगितलं.

संपूर्ण सावरकर वाङ्मयाचे वाजपेयींच्या हस्ते प्रकाशन

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या संपूर्ण वाङ्मयाच्या पाच खंडांचे दिल्ली येथे पंतप्रधान अटलविहारी वाजपेयी यांच्या हस्ते ३ मे रोजी प्रकाशन झाले. पंतप्रधानांच्या निवासस्थानी आयोजित या समारंभाचे अध्यक्षस्थान उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांनी भूषविले.

जातीचा अभिमान असावा, दुराभिमान नसावा - डॉ अरुण टिकेकर

मुंबईच्या जडणघडणीमध्ये ज्यांचा ज्यांनी सहभाग दिला आहे. त्यांत सारस्वतांचा सहभाग मोलाचा असल्याचे सांगून ज्ञातीच्या व्यासपीठावर अपराधीपणाची भावना असू नये. ज्ञातीचा अभिमान असावा, परंतु दुराभिमान नसावा, असे उद्गार 'लोकसत्ता'चे माजी संपादक अरुण टिकेकर यांनी काढले. 'सारस्वत चैतन्य'चे संपादक रवींद्र पाटकर व उद्योगपती गजानन तिरोडकर हे यावेळी उपस्थित होते.

ज्ञातीतील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करावा, त्यांची चरित्रे लिहून पुस्तकरूपाने प्रकाशित करावी, अशी कामे ज्ञातिसंस्थांनी करावयास हवीत, कारण अशी चरित्रे सर्वांनाच उपयोगी पडतात. गो. मं. लाड यांच्या 'सारस्वत- भारतीय संस्कृतीचे उपासक' या ग्रंथाचे प्रकाशन करून संस्थेने एक चांगले कार्य केले आहे, ज्ञातीतील ज्येष्ठ व कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्यात आला. त्यात प्रभाकर वा. रेगे, गिरिजा कीर, ॲड. एस. व्ही. पिकले, डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर, वनमाला सरदेशपांडे, कांताशेठ नेरूरकर आदींचा समावेश होता. प्रभाकर वा. रेगे यांनी यावेळी संस्थेला १ लाख २५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली.

श्रद्धांजली

इतिहास संशोधक बाळासाहेब पाटील

हैदराबाद मुक्ति संग्रामातील अग्रणी व ज्येष्ठ इतिहास संशोधक, स्वातंत्र्य सैनिक व नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झट याने निधन झाले. शिवाजी महाराज निरक्षर होते, हा समज महाराजांनीच स्वाक्षरी केलेला दस्तऐवज शोधून काढून, खोटा ठरविल्यामुळे ते प्रसिद्ध झाले होते.

प्रत्यक्ष लेखनापेक्षा ऐतिहासिक वस्तू जमा करून, त्यांनी अत्यंत परिश्रमाने वस्तू संग्रहालय उभे केले होते. ऐतिहासिक वस्तू व हस्तलिखित मिळविण्याचा त्यांचा ध्यास अविरत चालू होता. इतिहास संशोधकाबरोबरच कार्यकर्ता, पत्रकार, राजकारणी, उत्तम वक्ता असे त्यांच्या व्यक्तित्वाला अनेक पैलू होते. त्यांच्या निधनाने ऐतिहासिक पैठण नगरीतील चालताबोलता इतिहास लुप्त झाला आहे.माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, लोकसभेचे सभापती मनोहर जोशी यांसारख्या मान्यवरांनी त्यांच्या वस्तूसंग्रहालयाला भेट देऊन त्यांच्या कार्याची प्रशंसा केली होती.

भाषातज्ज्ञ डॉ. अ. मा. घाटगे

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भाषातज्ज्ञ डॉ. अमृत माधव घाटगे यांचे ८ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे चार मुलगे व पाच मुली असा परिवार आहे.

डेक्कन कॉलेजच्या संस्कृत महाकोशाचे आणि भांडारकर संस्थेच्या प्राकृत महाकोशाचे पहिले संपादक म्हणून त्यांचे काम महत्त्वाचे आहे. कोल्हापूरजवळच्या महागाव येथे १० ऑगस्ट १९१३ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांनी १९३४ मध्ये पाली-प्राकृत या विषयात आणि १९३६ मध्ये संस्कृत-इंग्रजीत अशी दोन वेळा एम.ए. पदवी घेतली. जर्मन, ब्रह्मी, सिंहली या भाषाही ते शिकले. कोल्हापूर, धारवाड, अमळनेर येथे त्यांनी अध्यापन केले. १९५६-५७ ला रॉकफेलर फाउंडेशनची शिष्यवृत्ती मिळवून त्यांनी पेनसिल्वानिया विद्यापीठात भाषाशास्त्राचे तौलनिक अध्ययन केले.डेक्कन कॉलेजचा भाषा प्रकल्प, पुणे विद्यापीठाच्या भाषाशास्त्र विभागाचे प्रमुख, विद्यापीठ अनुदान मंडळाच्या भाषाशास्त्र प्रगत अध्ययन केंद्राचे संचालक अशा विविध पदांवर त्यांनी काम केले. १९७३ मध्ये ते डेक्कन कॉलेजचे संचालक झाले. संस्थेच्या संस्कृत महाकोशाचे प्रमुख संपादक बनले. १९७८ ते ८३ या काळात त्यांनी हे काम पाहिले. निवृत्तीनंतर १९८७ मध्ये

भांडारकर संस्थेच्या प्राकृत महाकोशाचे ते संपादक झाले. त्यांनी या कोशाचे तीन खंड प्रकाशित केले. संस्थेचे मानद सचिव म्हणून १९९३ ते ९९ पर्यंत त्यांनी काम पाहिले.तर्कशास्त्र, व्याकरण, गणित, इतिहास, ज्योतिष आदी विषयांमध्ये ते सतत चिंतन, मनन करीत असत. ऐतिहासिक तत्त्वाधारित ज्ञानकोश शब्दकोश या प्रकल्पासाठी त्यांनी केलेले काम अभ्यासकांच्या पुढच्या पिढ्यांनाही मार्गदर्शक ठरणार आहे.

ज्येष्ठ साहित्यिक, अभिनेते वसंत पोतदार

साहित्य, अभिनय, संगीत, उर्दू शायरी आदी क्षेत्रांत अधिकार गाजवणारे व फिरस्ता म्हणून महाराष्ट्राला परिचित असणारे वसंत गोविंद पोतदार (वय ६५) यांचे ३० एप्रिलला हृदयविकाराने निधन झाले. नाशिक जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयास त्यांचे देहदान करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी रेखा, मुलगी सारस, असा परिवार आहे.

वसंत पोतदार यांच्या निधनाने एक कलंदर फिरस्ता नाहीसा झाला आहे. फिरणारी माणसे तशी खूप असतात. पण पोतदार मात्र जेथे जातील तेथे मातीचा गंध जमा करायचे, माणसे गोळा करायचे, तेथील संस्कृतीचा आरपार अभ्यास करायचे आणि हीच माती, तिचा गंध आणि तेथील माणसांना आपल्या लेखनाचे नायक बनवायचे. चांगला मित्र, चांगला खवय्या, चांगला रसिक, चांगला अभिनेता आणि वक्ता, चांगला लेखक, आणि आपल्या सात मजली हास्यात समोरच्या अनोळखी माणसालाही एका क्षणात आपलेसे करणारा कलंदर म्हणजेच पोतदार. जग विविधतेने नटलेले आहे म्हणून आपल्या लेखनालाही विविधतेचा पिसारा असला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. हा पिसारा फुलवण्यासाठी त्यांनी प्रचंड कष्ट घेतले. एखादा विषय निवडला, की ते त्यात हरवून जात.

पोतदार यांचे सारे आयुष्य बिनधास्त, बेधडक, स्वाभिमानी आणि करारी आदी पैलूंनी भरले होते. देशाच्या कानाकोपऱ्यात त्यांचा मित्रपरिवार आहे. जीवनाला बिनधास्तपणे सामोरे जाणारा आणि क्रिकेटपासून शेर-शायरीपर्यंत अनेक दालने जिंकून बहुश्रुत बनलेला त्यांच्यासारखा कलंदर विरळाच.

ज्येष्ठ विज्ञानप्रसारक श्रीपाद केळकर यांचे निधन :

ज्येष्ठ विज्ञानप्रसारक व लेखक श्रीपाद विनायक केळकर (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने पाच मे रोजी निधन झाले. त्यांच्या मागे दोन चिरंजीव व एक कन्या असा परिवार आहे.

श्री. केळकर राज्य शिक्षण संस्थेमध्ये रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. सृष्टिज्ञान या विज्ञान मासिकात विविध विषयांवर त्यांनी सातत्याने लिखाण केले. या मासिकाच्या संपादक मंडळाचे ते मानद सदस्य होते. विज्ञानविषयक अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. विज्ञानविषयक लेखनासाठी त्यांना महाराष्ट्र राज्य विज्ञान साहित्य पुरस्कार मिळाला होता.

कोशकार विश्वनाथ नरवणे

भारतीय व्यवहार कोश व भारतीय कहावत संग्रहाचे संपादक विश्वनाथ दिनकर नरवणे यांचे ८ मे रोजी निधन झाले. गेले काही महिने त्यांना हृदयविकाराचा त्रास होत होता.

श्री. नरवणे यांचा जन्म रत्नागिरीजवळच्या नाखरे येथे १८ ऑगस्ट १९२४ ला झाला. त्यांचे शालेय शिक्षण रत्नागिरी व मुंबई येथे झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामासाठी गुजरातला गेल्यावर बडोदा येथे त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. दादरा नगर हवेली मुक्ती लढ्यातही त्यांचा सहभाग होता. भाषाविषयाच्या प्रेमातून त्यांनी पंधरा भारतीय भाषांचा अभ्यास केला. त्यातूनच पुढे पंधरा भारतीय भाषा व इंग्रजी भाषा यांमधील व्यवहारात उपयोगी येणाऱ्या समानार्थी शब्द देवनागरी लिपीमध्ये देण्यासाठी भारतीय व्यवहार कोशची निर्मिती केली. त्यानंतर या सोळा भाषांमधील म्हणींचा अभ्यास करून भारतीय कहावत संग्रह या तीन खंडांतील संदर्भग्रंथाची रचना केली.त्यामध्ये विषयावर सर्व भाषांमधील समानार्थी म्हणी हिंदी-इंग्रजी अनुवादासह देण्यात आलेल्या आहेत. या दोन कोशांमुळे त्यांचा कोशकार म्हणून गौरव झाला.

इतर भाषांतील साहित्याचा परिचय करून देण्यासाठी त्यांनी काव्यनायक शिवाजी, भारतीय महिला कवयित्री, लाशित बडफुकन (आसामचा शिवाजी) हे संशोधनपर लेख लिहिले. उर्दू भाषेतील शेरांचे आणि गझलांचे समवृत्तात अनुवाद केलेले शेष सुंदर हे त्यांचे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे.

श्री. नरवणे यांना राष्ट्रपतिपदक, उत्तर प्रदेशचा सौदार्द सन्मान, महाराष्ट्राचा छत्रपती शिवाजी एकता पुरस्कार, अखिल भारतीय साहित्य परिषदेचा पुरस्कार असे अनेक सन्मान मिळाले आहेत.

एखाद्या भाषेवर प्रभुत्व मिळवून त्यातील व्यासंगाने पंडित ठरणाऱ्यांची संख्याही आता अत्यल्प झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर भारतातील जवळजवळ सर्व भाषांचे सखोल अध्ययन करून आपल्या कोशांद्वारे राष्ट्रीय एकात्मता साधणारे विश्वनाथ नरवणे हे महापंडित होते. वाचन, अध्ययन, संशोधन आणि त्याची मांडणी यांत जीवन व्यतीत करणारे नरवणे यांनी पंधरा भारतीय आणि इंग्रजी अशा सोळा भाषांतील समानार्थी शब्दांचा बनविलेला भारतीय व्यवहार कोश ही राष्ट्रीय साहित्यातील एक लक्षणीय कृती आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू आणि डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यासारख्या उच्चपदस्थांना त्यांच्याशी गप्पागोष्टी करताना कार्यालयीन कर्तव्यांचाही विसर पडला होता. नरवणे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक होते, हे माहीत असूनही एस.एम.एस. नंबुद्रिपाद यांच्यासारख्या कम्युनिस्ट नेत्याने त्यांच्याशी वैयक्तिक स्नेह जोडला होता तो त्यांच्या भाषासमृद्धीमुळे. व्यासंग म्हणजे केवळ ग्रंथवाचन नव्हे, याची जाणीव ठेवून श्री. नरवणे यांनी प्रत्येक प्रांतातील बारकावे तेथे जाऊन आत्मसात केले. बहुभाषी भारतातील जनतेला जोडण्यासाठी भाषा हे अडथळे न ठरता त्यांचे पूल बनवावेत, या ध्येयासाठी ते सतत कार्य करीत राहिले. सर्व स्तरांतील मानसन्मान मिळूनही ते विनम्र राहिले.

पुस्तक परिचय

सेव्हिंग फेथ

मूळ लेखक : डेव्हिड बेल्डासी
अनुवाद : माधव कर्वे

सी आय ए आणि एफ बी बाय या अमेरिकन गुप्तहेर यंत्रणांच्या कार्यप्रणालीमधील चुरस आणि फरक दाखवणारी थरारकथा

'सेव्हिंग फेथ' ही अमेरिकन बेस्टसेलर लेखक डेव्हिड बेल्डासी याची गाजलेली कादंबरी आता मराठीत आली आहे. माधव कर्वे यांनी तिचा अनुवाद केलेला आहे.

'सेव्हिंग फेथ' हे नाव अर्थपूर्ण आहे. या थरारकथेची नायिका फेथ लॉकहार्ट हिला वाचवणे या अर्थाने हे शीर्षक समर्पक आहे, तसेच आपल्या जीवनावरची आणि कार्यावरची श्रद्धा पुन्हा दृढ करणे या अर्थानेही हे शीर्षक चपखल लागू पडते.

फेथ लॉकहार्ट ही तरुणी डॅनी बुर्कनन याची मदतनीस. डॅनी बुर्कननचा पेशा समाजसेवेचा. गरीब देश, जागतिक मानवतावादी संघटना आणि स्वयंसेवी संस्था यांना अमेरिकेकडून भरघोस आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचा.

हे अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी बुर्कननला आपले मुत्सद्दीपण वापरावे लागे. सिनेटर्सना आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना पटवावे लागे. परंतु ते केवळ भूतदयेच्या भावनेने ही मदत देण्याला राजी होतात असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. बुर्कनन त्यांना काही आमिषही दाखवत असे, काही प्रलोभनेही दाखवत असे. आणि गरीब देशांकडूनही काही कमाई करीत असे. प्रसंगी स्वत:चा पैसाही वापरत असे, परंतु समाजसेवेद्वारे अर्थप्राप्तीही साधत असे. बुर्कननला या कामात फेथ लॉकहार्ट ही सहाय्य करीत असे.

केवळ उदात्त भावनेतून गरीब देशांना मदत करणे हा प्रकार एका विशिष्ट टप्प्यापर्यंत निर्वेधपणे चालू राहिला, आणि बुर्कननला त्यामुळे वॉशिंग्टनच्या उच्चभ्रू वर्तुळात मानसन्मान मिळत राहिला हे खरे; परंतु बुर्कननच्या या उच्च वर्तुळातील संपर्काचा फायदा उकळण्याची कल्पना कोणाच्या तरी तल्लख मेंदूतून निघते आणि बुर्कननचा एक साधत म्हणून वापर करण्यास आरंभ होतो; तेव्हा प्रचंड उलथापालथ होणे अपरिहार्यच!

'सेव्हिंग फेथ' मध्ये डेव्हिड बेल्डासीने या कल्पनेवर एक मोठाच रोमांचकारक आणि रहस्यपूर्ण डोलारा उभा केला आहे

बेल्डासीने या कथानकाचा डोलारा उभा करताना आणखी एका वास्तवाचा वापर केलेला आहे.अमेरिकन सरकारच्या गुप्तहेर यंत्रणेचे काम सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी (सीआयए) आणि फेडरल ब्युरो ऑफ इनव्हस्टीगेशन (एफबीआय) या दोन स्वायत्त संघटनांमार्फत

सीआयए त्याच्या दृष्टीने अधिक दगाबाज, पाताळयंत्री आणि निष्ठुर असून, ती प्रसंगी राजकीय नेत्यांना ब्लॅकमेलही करते असे दाखवले आहे.

होते. सीआयएचे कार्यक्षेत्र देशाबाहेर- म्हणजे परदेशात हेरगिरी करणे, अमेरिकेला विरोध करणाऱ्या देशांमध्ये सत्तापालट घडवून आणणे, तेथील अमेरिकानिष्ठ व्यक्तींना मदत करणे, सत्ताधीश आणि अधिकारी यांना विकत घेणे, तेथील निर्णयप्रक्रियेवर दबाव आणणे वगैरे त्यासाठी सीआयएचे एजंट सर्वत्र संचार करीत असतात. घातपात घडवून आणत असतात. वगैरे. एफबीआयचे कार्यक्षेत्र हे अमेरिकेतील अंतर्गत राजकारण आणि गुन्हेगारी यांच्यावर नजर ठेवणे. मुख्यत: गुप्त माहिती गोळा करणे. सीआयएला आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी कोणाचा खून करणे, बळी देणे यात कसलाही विधिनिषेध वाटत नाही. हस्तेपरहस्ते नको असलेल्या व्यक्तीचा काटा काढणे हा सीआयएच्या हातचा मळ! एफबीआय मात्र फक्त चौकशी करणार. माहितीची जमवाजमव यावर भर देणार. कुणाची हत्या करणे वगैरे एफबीआयच्या दृष्टीने अगदीच गर्ह्य. त्याज्य! या दोन्ही संघटनांच्या कार्यपद्धतीतही फरक आहे. दोन्ही संघटनांनी एकत्र येऊन काम करण्याच्या कल्पनेला त्यामुळे अनेक संबंधितांचा विरोधही असतो. त्या दोन्हीत स्पर्धा असते, कधी कधी सत्ता स्पर्धाही असते.

डेव्हिड बेल्डासीने या दोन संघटनांमधील दुराव्यावर आणि सत्ता संघर्षावर भर देऊन आपल्या कथानकात अनेक गुंते निर्माण केले आहेत. या दोन्ही संघटना एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात असे त्याने दाखवले आहे. सीआयए त्याच्या दृष्टीने अधिक दगाबाज, पाताळयंत्री आणि निष्ठुर असून, ती प्रसंगी राजकीय नेत्यांना ब्लॅकमेलही करते असे दाखवले आहे.

मागासलेल्या, गरीब, विकसनशील देशांतील रंजल्यागांजल्या लोकांच्या सेवेसाठी मदतीचा ओघ चालू राहावा म्हणून प्रयत्नशील असणाऱ्या डॅनी बुर्कननच्या तळमळीची कदर करणारे अनेक सिनेटर्स व नेते असतात. वर्षानुवर्षे बुर्कननने त्यांची मर्जी सांभाळून, मनधरणी करून, त्यांना आपल्या बाजूने वळवलेले असते.

''मी कोणी हेर नाही की जादूगार नाही. मी एक सध्या लॉबीइस्ट आहे. गोरगरीबांसाठी मदतीचा ओघ चालू राहाव म्हणून धडपडणारा. माझी जमेची बाजू कायतर या शहराची मला असलेली माहिती आणि वरपासून खालपर्यंत पसरलेला माझा मित्र परिवार.'' असे म्हणणाऱ्या बुर्कननला कुठल्याही पदात किंवा सत्तेत रस नव्हता. कुणाचही मन वळवण्याची कला त्याला अवगत होती आणि तिच्या बळावर तो आपल्याला हवं ते काम करून घेण्यात तरबेज होता. अमेरिकेच्या संसदेतले अनेक सदस्य बुर्कननच्या म्हणण्याप्रमाणे मतदान करत; परदेशी मदतीचा ओघ चालू ठेवत. 'या मदतीमुळे आमच्या मतदारसंघात चार मतेही आम्हाला जास्त पडणार नाहीत' हे ठाऊक असूनही हे सदस्य बुर्कननच्या आर्जवापुढे मान झुकवत. तब्बल वीस वर्षांच्या कालावधीत बुर्कननने आपला हा प्रभाव टिकवून धरला होता आणि सर्वांची मर्जी राखून 'लॉबीइंग' करण्यातली आपली अचाट क्षमता सिद्ध करून दाखवली होती. प्रदूषणाला कारणीभूत ठरणाऱ्या औषध कंपन्या,

अमेरिकेत बंदी असलेल्या रासायनिक द्रव्यांची निर्यात करणारे उत्पादक तंबाखू-सिगरेट व्यावसायिक - यांच्या विरोधात ही बुकॅननची तोफ तुटून पडे

हजारो निरपराध नागरिकांचा बळी घेणाऱ्या शस्त्रास्त्रांचे कारखानदार, मानवी जीवाला अपायकारक असणाऱ्या व अमेरिकेत बंदी असलेल्या रासायनिक द्रव्यांची निर्यात करणारे उत्पादक तंबाखू-सिगरेट व्यावसायिक - यांच्या विरोधात ही बुकॅननची तोफ तुटून पडे; आणि आपल्या बाजूने मतदान व्हावे म्हणून सिनेटर्सना तो ज्या रीतीने भाग पाडत असे, ते त्याचे कौशल्यही अफलातून म्हणावे लागेल.

डॅनिएल बुकॅनने कॉलेज संपल्यावर स्वत:चा व्यवसाय उभा करायचे आणि लग्न करून संसार थाटायचे असे ठरवले होते; परंतु त्याआधी थोडे जग बघून घ्यावे म्हणून काही दौरे केले; त्यावेळी पश्चिम आफ्रिकेतील अस्वच्छता आणि माणसाच्या वाट्याला आलेले दु:ख-दारिद्र्य त्याला बघायला मिळाले. सुदानमध्ये कुठल्याशा रोगाच्या साथीने बळी घेतलेल्या शेकडो मुलांचे सामुदायिक दफन त्याला बघायला मिळाले. चिनी बंदरात उतरवण्यात येणाऱ्या अब्जावधी अमेरिकन सिगरेटींचा डोंगर त्याच्या नजरेत पडला. अमेरिकेने बंदी आणलेली संतती नियमनाची साधनं लाखोंनी लॅटिन अमेरिकेत खपवण्यात येत आहेत हे त्याने बघितले, मोक्सिकाने गगनचुंबी इमारतीच्या शेजारीच झोपडपट्ट्यांची गर्दी दिसली; आणि त्याच्या जीवनविषयक दृष्टिकोनात एकदम फरक पडला. लग्न, स्वत:चं कुटुंब, सुखी संसार याबद्दलची ओढ विरून गेली. जगातल्या उपासमारीशी लढा द्यायला हवा म्हणून, तंबाखू उत्पादक, शस्त्रास्त्र उत्पादक, रसायनं उत्पादक यांच्या संघर्षात उभं रहाण्याचा निर्णय तो घेतो. मानवतावादी संघटनांसाठी विनावेतन मदतनिधी उभारण्याचं काम तो करू लागतो. या नव्या लॉबी हंगेच्या कामात त्याला खरी मदत मिळते ती फेथ लॉकहार्टची. बुकॅनन आपलं सर्वस्व नाहीरे वर्गातल्या लोकांच्या मदतीसाठी पणाला लावतो. आपली आजवरची पुण्याई त्यासाठी वापरतो. ''इथिओपियातल्या उपासपोटी लोकांना खाऊपिऊ घालून मला शिकागोत कसं निवडून येता येईल?'' या सारख्या सिनेटर्सच्या प्रश्नांना तोंड देत, तो तिसऱ्या जगातल्या मुलांसाठी मदत गोळा करतो. ''व्यापार, तेल आणि सैन्य यापैकी कशाशी संबंध नसेल तर उगीच माझा वेळ का खातोस?'' असे अनेक सिनेटर विचारत; तेव्हा बुकॅनन राजकारण्यांना चक्क लाच देऊन मदतनिधीच्या विधेयकाला संमती मिळवण्याचा मार्गही चोखाळू लागतो. सिनेटर म्हणून निवृत्त झाल्यावर तुम्हांला ठराविक तनखा मिळेल अशी तरतूद करू लागतो.

असा हा जनहितासाठी सर्वस्व वेचण्याचा स्वार्थहीन उद्योग चालू असताना एके दिवशी सीआयए मध्ये स्वत:चा मोठा गट असणारा अधिकारी रॉबर्ट थॉर्नहिल डॅनीला भेटून सांगतो, ''कॉंग्रेस सदस्यां विरुद्ध त्यांना ब्लॅकमेल करता येईल असे पुरावे गोळा करण्याच्या कामात तू आम्हाला मदत कर... परदेशांना मदतनिधी देण्याचे अधिकार ज्यांच्या हातात आहेत अशा कॉंग्रेस सदस्यांना आणि अधिकाऱ्यांना भेटून, त्यांना सत्तेवरून दूर झाल्यावर निश्चित मानधनाची खात्री देऊन आपल्या इच्छेप्रमाणे मतदान करणे भाग पाडायचे... त्यांच्या गैरव्यवहाराबाबतची संभाषणे टेप करायची आणि सीआयएच्या कामात

व्यापार, तेल आणि सैन्य यापैकी कशाशी संबंध नसेल तर उगीच माझा वेळ का खातोस ? असे अनेक सिनेटर विचारत.

त्यांना विरोध करण्यापासून रोखायचे; सीआयएचे बजेट वाढवायचे. त्या बदल्यात सीआयएकडून त्यांना मोठी रक्कम मिळेल अशी आशा दाखवायची...

या योजनेत बुकॅननला नाइलाजाने सामील व्हावे लागते. त्याच्या वागण्यातील फरक फेथच्या ध्यानात येतो, तेव्हा ती बुकॅननची साथ सोडण्याचे ठरवते; आणि बुकॅननची माहिती एफबीआयला कळवण्याचा मनोमन निर्णय घेते...

हे कळल्यावर थॉर्नहिल तिला ठार मारण्यासाठी आपल्या विश्वासू सहकाऱ्याला पाठवतो.

...परंतु फेथला मारण्याचा प्रयत्न विफल होतो आणि एफबीआयचा दुसरा एजंट केन न्यूमन हाच गोळीला बळी पडतो...

फेथला वाचवण्यासाठी, तिच्यावर नजर ठेवण्यासाठी बुकॅननच ली ॲडम्स या खाजगी डिटेक्टिव्हची नेमणूक करतो.

फेथला तो केनच्या मृत्यूनंतर आपल्या बरोबर घेऊन पळ काढतो.

... तो कोण, आपण त्याच्यावर विश्वास टाकायचा तरी कसा अशा संभ्रमात असलेली फेथ नाइलाजाने, अनिच्छेने त्याच्याबरोबर जाते...

सीआयए आणि एफबीआय या दोन्ही यंत्रणा परागंदा झालेल्या फेथच्या आणि ती ॲडॅम्सच्या शोधासाठी आपल्या सर्व सामर्थ्याची बाजी लावतात...

डेव्हिड बेल्डासी अमेरिकेतील या दोन्ही गुप्तहेर यंत्रणाच्या कामकाजाची, झपाट्याची, सर्वंकष प्रभावाची वेगवेगळी प्रात्यक्षिके दाखवत, त्या यंत्रणांच्या हातावर तुरी देण्याएवढी कल्पकता ली ॲडॅम्स आणि फेथ कशी प्रकट करतात हे स्पष्ट करतो. आणि कथानकात थरारनाट्याचे रंग भरत जातो...

'सेव्हिंग फेथ' हे उद्दिष्ट शीर्षकातच नमूद केलेले असल्याने फेथ लॉकहार्ट ही नायिका अखेर सहीसलामत राहणार हे उघडच आहे. पण त्या प्रक्रियेने अमेरिकेतील शासकीय तसेच पोलिस यंत्रणा आणि सीआयए-एफबीआयचे व्यापक सर्वंकष मायाजाल यांचीही कार्यक्षमता अजमावून बघितली जाते. एफबीआयच्या आश्रयाला आलेल्या फेथचे रक्षण करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे असे मानणारी ब्रूकलिन रेनॉल्डस एकीकडे तर सीआयएच्या ब्लॅकमेलच्या योजना उघडकीला आणण्यात फेथ लॉकहार्टची भूमिका निर्णायक ठरू शकेल म्हणून तिला ठार मारून, तिचे अस्तित्वच संपुष्टात आणण्याची थॉर्नहिलची कपटनीती यात सरशी सत्प्रवृत्त ब्रूकलिनची एफबीआयची व्हावी अशी दक्षता डेव्हिड बेल्डासी घेतो.

खोल्याखोल्यात लपवण्यात आलेली गुप्त टेपरेकॉर्डर्स व कॅमेऱ्यासारखी साधने, सुरक्षिततेच्या योजना, वाहनात दडवण्यात आलेल्या संदेशवहन यंत्रणा, क्रेडिट कार्डवरून किंवा फोनवरून कोणाचाही ठावठिकाणा शोधून काढण्यातील चपळता, विमानकंपन्या, बस स्टेशन्स वगैरे ठिकाणी असणाऱ्या गुप्तचरांच्या पलटणी- यांची वर्णने वाचताना

अविकसित देशांना आर्थिक मदत करण्याची बाब ही केवळ भूतदया नसते, तिच्या मागे प्रचंड राजकारण असते, लॉबीइंग असते; ब्लॉकमेलिंग असते.

आश्चर्याचे धक्क्यावर धक्के बसतात.

फेथ लॉकहार्ट आणि ली ॲडॅम्स यांच्यातही वेगळेच भावबंध निर्माण होतात. त्याचेही हृद्य दर्शन कादंबरीत घडते.

अविकसित देशांना आर्थिक मदत करण्याची बाब ही केवळ भूतदया नसते, तिच्यामागे प्रचंड राजकारण असते, लॉबीइंग असते; ब्लॉकमेलिंग असते; लाचलुचपतीचे विषचक्र असते- हे बेल्डासी स्पष्ट करतो. त्याचप्रमाणे सीआयए आणि एफबीआय यांच्या कार्यपद्धतीत आणि भूमिकेत दोन ध्रुवाइतका फरक कसा पडतो, यावरही प्रकाश टाकतो. तसेच या संघटनांमधील स्पर्धा एकमेकांना पेचात पकडून बदनाम करण्यात व आपले घोडे पुढे दामटण्यात कशी निर्घृणपणे बेदरकार वागायला लावते त्याचीही चुणूक दिसते. अमेरिकेसारख्या देशात लोकशाहीच्या नावाखाली लोकशाहीला हरताळ फासणाऱ्या अनेक प्रथा-परंपरांकडे सफाईदारपणे डोळझाक कशी होते- हेही या कादंबरीद्वारे वाचकांपुढे उघड केले जाते.

सीआयए आपल्याला नकोशा असलेल्या व्यक्तीला लीलया नष्ट करू शकते; फेथला मारण्याची सुपारी दिली जाते; पण ती वाचते ही गोष्ट अलाहिदा! परंतु हे सगळे गैर व गलिच्छ मार्ग चोखाळले जात असूनही, चांगुलपणाचीच शेवटी सरशी होते, दुष्ट दुर्जनांची पीछेहाट होते - हेही लेखक आग्रहाने आवर्जून दाखवतो, आणि चांगुलपणावरची वाचकांची व आपली श्रद्धा नि:संदिग्धपणे प्रकट करतो या गोष्टीलाही महत्त्व आहेच.

अमेरिकेसारख्या प्रगत देशातील सीआयए आणि एफबीआय सारख्या गुप्तहेर यंत्रणांच्या कार्यपद्धतीतील गुणदोषांची वास्तवदर्शी पेशकश करणारी ही थरारकथा नाट्यपूर्ण डावपेच आणि परस्परांवर मात करण्याची अहमहमिका यामुळे वाचकांना खिळवून ठेवते.

डॅनी बुकॅनन, फेथ लॉकहार्ट, ली ॲडॅम्स, ब्रूक रेनॉल्डस, थॉर्नहिल इत्यादी व्यक्तिरेखाही मनावर खोल ठसा उमटवतात. त्यांच्या रूपाने वेगवेगळ्या प्रवृत्तींचे भलेबुरे दर्शन होते. निष्ठा व श्रद्धा तावून सुलाखून निघतात.

सीआयएचे व एफबीआयचे सहकार्य टाळून, सीआयएची स्वतंत्र व पृथक प्रतिमा थॉर्न हिल जपू पाहतो. एफबीआयच्या एजंटाला ठार मारण्याच्या योजना आखतो. त्या पार पाडतो. बुकॅनन ली ॲडॅम्स यांना संपवण्याची भाषा करतो. एफबीआय एजंटच्या हत्येला सीआयए जबाबदार आहे, थॉर्नहिल त्या कटाचा सूत्रधार आहे हे त्याच्याच तोंडून वदवून घेतल्यावर, सुटकेचा मार्गच त्याच्यापुढे राहत नाही. सुनावणीच्या वेळी थॉर्नहिलचा विश्वासू सहकारी फिल विन्स्ला हा त्याला बजावतो, ''हे प्रकरण आणखी ताणणं आपल्याला परवडणार नाही आम्ही हे खटल्यापर्यंत जाऊ देणार नाही, आणि आम्ही तुला निसटूही देणार नाही. हे संपवणं तुझ्या हातात आहे.''

तेव्हा आपणच आपलं जीवन संपवायला हवं हे थॉर्नहिलच्या लक्षात येतं. थॉर्नहिल शहराबाहेर जाऊन कारमध्ये डोक्यात पिस्तुलाची गोळी झाडून स्वत:चा शेवट करतो.

पृष्ठे : २९६ किंमत : २०० रु. सभासदांना : १५० रु. पोस्टेज : २० रु.

धर्मयुद्ध

लेखक : रवींद्र ठाकूर

उपेक्षेचा आणि वर्णव्यवस्थेचा बळी ठरलेल्या महारथी कर्णाच्या अंतःकरणातल्या भळभळणाऱ्या जखमा उघड करणारी अंतर्वेधक कादंबरी

युद्ध हे कधीही धर्मयुद्ध नसते. युद्धात उतरायचे ते जिंकण्यासाठीच !

महाभारतातील कर्णाच्या जीवनावर मराठीत नाटके-कादंबऱ्यांची सातत्याने भर पडत आहे. मृत्युंजय (शिवाजी सावंत), राधेय (रणजित देसाई), कौंतेय (शिरवाडकर) या कृतींचे विशेष स्वागत झाल्याचे दिसते. कोल्हापुरचे मराठीचे अध्यापक प्रा. रवीन्द्र ठाकूर यांनी 'धर्मयुद्ध' या नावाने पावणेचारशे पृष्ठांची कादंबरी लिहून कर्णाच्या अंत:करणातला भळभळत्या जखमेचे दर्शन घडवले आहे. कर्ण हा वर्णव्यवस्थेचा बळी आहे, आणि सारथ्याचा पुत्र म्हणून त्याला सतत उपेक्षेचीच वागणूक मिळते. अर्जुनाशी बरोबरी करू पाहणाऱ्या कुमार कर्णाला द्रोणाचार्य सांगतात, ''तू क्षत्रिय नाहीस. सारथ्याच्या मुलाला राजपुत्रांसोबत शिकता येत नाही..... तुला धनुर्विद्या शिकायची असेल तर क्षत्रियांच्या इतर मुलांबरोबर शिक. कृपाचार्यांना विनंती कर.'' कर्णाच्या मनात या उपेक्षेबद्दल साहजिकच सुप्त राग आहे आणि तो वेळोवेळी कादंबरीकार रवीन्द्र ठाकूर प्रकट करतात.

अश्वशाळेतील मलमूत्राचा उग्र वास... या उग्रवासापासून दूर गेलं पाहिजे. ही त्याची इच्छा. वायुवेगानं धावणाऱ्या रथांचा खडखडाट, रणवाद्यांचा जल्लोष, प्रत्यंचेचे टणत्कार, भीषण रणकंदन, सैनिकांचा विजयोन्माद, जयजयकाराचा ध्वनी आणि त्यातून येणारा ताज्या रक्ताचा उग्र दाहक वास - यांची त्याला ओढ.

हस्तिनापूरच्या वार्षिक शस्त्रकौशल्य प्रदर्शन स्पर्धेत अर्जुनाची शब्दविद्येची, धनुर्विद्येची प्रात्यक्षिके प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी होतात. त्याला एक तरुण आव्हान देतो. अर्जुनासारखेच कौशल्य तो दाखवतो. पण तो कर्ण आहे हे लक्षात येताच द्रोणाचार्य त्याला अडवतात, कृपाचार्य बजावतात: अर्जुन क्षत्रिय राजपुत्र आहे. क्षत्रिय राजपुत्रच त्याच्याशी युद्ध करू शकतो.

दुर्योधन कर्णाच्या पराक्रमाने हर्षभरित होऊन म्हणतो, ''क्षत्रियत्व ठरतं ते बाहुबळावर. कुलावरून नव्हे.... तो राजा नाही एवढीच अडचण असेल तर मी युवराज दुर्योधन त्याला या क्षणी अंगदेशाचा राजा घोषित करतो. अंगराज कर्ण आजपासून माझा मित्र आहे.''

कर्णाला असे राजपद मिळाले तरी सूतपुत्र म्हणूनच त्याच्याकडे पाहिले गेले.

‘जन्म दैवाधीन असला तरी माझा पराक्रम दैवाधीन नाही... क्षत्रियाला आवश्यक त्या सर्व विद्या आपण कष्टने मिळवल्या आहेत याचा सार्थ अभिमानही त्याला आहे.

कर्णाच्या मनात आपल्या विखारी अपमानाची भावना सतत घोटाळत असते.“बाबा कदाचित तो आपला अपमान विसरून जातील किंवा विसरण्याचा प्रयत्न करतील. परंतु हा कर्ण तो अपमान कधीही विसरू शकणार नाही...आचार्य द्रोण, मी त्या अपमानित पित्याचा पुत्र आहे. तुम्ही केलेल्या अपमानाचा निखारा काळजावर ठेवून मी धनुर्विद्या ग्रहण करतो आहे. एके दिवशी तुम्हाला पश्चात्ताप करायला भाग पाडीन. योग्यता सिद्ध करून दाखवीन आणि त्या अपमानाचा बदला घेईन तरच नावाचा कर्ण!’’ (पृष्ठ ५)

‘‘अशाच एका उगवत्या पहाटे आपली गंगामाई तुला आमच्या पदरात घालून गेली आहे बरं बाळ वसू’’ असे त्याला बाबा सांगत तेव्हा ते त्याला लहानपणी खोटे वाटे. परंतु शत्रुंजय आणि संग्रामजित यांच्यापेक्षा आईची माया आपल्या वाट्याला अधिक आली याचीही जाणीव त्याला आहे आणि ‘ही मातेची माया आहे की एका अश्राप मुलाकडे कणवेनं पाहणारा दयाभाव आहे?... कोण असेल माझी आई? आपल्याला जन्मत:च नदीत सोडून देणं भाग पडावं असा कोणता आपला अपराध होता? आपलंच मूल नदीच्या काळलाटांवर सोडून देताना तिला काहीच का वाटलं नसेल? तिला माया नव्हती की तिच्या कुठल्यातरी पापाचं फळ म्हणून मी नकोसा झालो होतो?’ असे अनेक प्रश्न बालपणी कर्णाला पडतात; आणि ‘जन्म दैवाधीन असला तरी माझा पराक्रम दैवाधीन नाही... क्षत्रियाला आवश्यक त्या सर्व विद्या आपण कष्टाने मिळवल्या आहेत याचा सार्थ अभिमानही त्याला आहे. परंतु त्याचवेळी कुठल्यातरी क्षत्रियाचं सारथ्य करण्यातच आपलं आयुष्य खर्ची पडणार, मग ही धनुर्विद्या, विद्या प्राप्त करण्यातली एवढे कष्ट कशाला हवेत’ असाही सवाल तो स्वत:ला विचारत असतो. (७)

अपमान, उपेक्षा, संताप, अभिमान, स्वपराक्रमाची इर्षा यांचे चमत्कृतिपूर्ण रसायन मिश्रण, दाखवून कादंबरीकार रवीन्द्र ठाकूर कर्णाच्या व्यक्तिमत्त्वाची भक्कम पायाभरणी करतात.

कर्णाची कथा सांगायची म्हणजे संपूर्ण महाभारताचीच कथा सांगायची - ही गोष्ट अपरिहार्यच.

रवीन्द्र ठाकूर यांनी १०१ प्रसंगांतून ३७२ पृष्ठांमध्ये या कथानकाचा डोलारा उभा केला आहे.

द्रोणाचार्यांच्या तालमीत तयार झालेल्या कौरव-पांडवांमधील वार्षिक शस्त्रविद्या प्रदर्शन सोहळ्यातही कर्णाच्या ‘क्षत्रिय’ नसण्याचा मुद्दा उपस्थित होतोच. त्यामुळे अर्जुन हा अजिंक्य ठरतो. दुर्योधन कर्णाच्या बाजूने उभा राहतो. त्याला अंगराज म्हणून घोषित करतो. द्रोणाचार्य गुरुदक्षिणा म्हणून उन्मत्त द्रुपदाला बंदिस्त करून घेऊन येण्याची इच्छा प्रदर्शित करतात. तेव्हा कर्ण म्हणतो, मी द्रोणाचार्यांचा विद्यार्थी नाही; ज्याच्या ऋणातून

अपमान, उपेक्षा, संताप, अभिमान, स्वपराक्रमाची इर्षा यांचे चमत्कृतिपूर्ण रसायन मिश्रण म्हणजे कर्ण

मुक्त व्हावं असा गुरू कर्णाला लाभला नाही आणि आता द्रोणाचार्यांसारख्या पक्षपाती माणसाचं मन सांभाळण्यासाठी काही करावं असं मला वाटत नाही.’’ (३२) तरीही दुर्योधनाचा मित्र व अंगदेशचा राजा म्हणून कर्ण या मोहिमेत सामील होतो. द्रुपदाला पकडण्याचे काम मात्र पांडवांकडूनच होते. दुर्योधन-कर्ण यांना द्रुपदाकडून पराभव पत्करावा लागल्याने भीमअर्जुन यांचा त्याला मत्सर वाटतो. (३४)

कर्णाची चंपानगरीला भेट, तेथे राजा म्हणून झालेले त्याचे स्वागत, द्रुपद राजाने पाठवलेले स्वयंवराचे नियंत्रण, ‘‘या सूतपुत्राला स्वयंवराचे निमंत्रण कोणी दिले? या सूतपूत्राला स्वयंवर मंडपात स्थान नाही... मी क्षत्रियकन्या आहे. त्यानं पण जिंकला तरी मी त्याला वरणार नाही’’ अशी द्रौपदीने केलेली घोषणा (५३), अर्जुनाशी झालेल्या संघर्षात कर्णाला पत्करावा लागलेला पराभव (५७), पांडवांना सन्मानपूर्वक पाचारण करून राज्याचा हिस्सा देण्याचा भीष्मांनी दिलेला सल्ला, दुर्योधनाने व धृतराष्ट्राने त्याला केलेला विरोध (६५), ‘‘ते असेलच तर कौंतेय आहेत. पांडव कदापीही नाहीत.’’ हा दुर्योधनाचा तर्क (६६), खांडववनात पांडवांना जाळून मारण्याचा धृतराष्ट्राचा कट (६८), जरासंधाचा पराभव (७८), भानुमती-दुर्योधन विवाह (७९), भानुमतीची दासी, सारथी प्रमुखांची कन्या, वृषाली हिचे द्वंद्व युद्धातील कर्णाचा पराक्रम पाहून त्याच्यावर अनुरक्त होणे (८०), वृषाली-कर्ण विवाहानिमित्त दुर्योधनाने दिलेले भोजनाचे निमंत्रण (८६) अशा प्रसंगातून कथानक पुढे जाते.

द्रोणाचार्यांना गुरू होण्याची पुन्हा प्रार्थना करावी आणि त्यांजकडून धनुर्विद्येची रहस्ये हस्तगत करावी असे दुर्योधन पुन्हा कर्णाला सुचवतो. त्याप्रमाणे द्रोणाचार्यांची भेट घेतल्यावर पुन्हा युक्तिवाद लढवला जातो.

‘‘सारथ्यानं जन्मप्राप्त कर्म सोडून क्षत्रियासारखं वर्तन करणं हा अधर्म आहे...’’ द्रोणाचार्य.

‘‘आर्यावर्तातील अनेक राजे जन्मानं क्षत्रिय नाहीत. तरीही लोक त्यांना क्षत्रियच समजतात. आणि मी करत आहे तो अधर्म असेल तर ब्राह्मणांनी क्षत्रिय कर्म स्वीकारणं हा धर्म कसा होऊ शकेल?’’ कर्ण

‘‘ब्राह्मण हे त्रैवर्णियांचे गुरू. त्यांना इतर वर्णीयांची कर्मे निषिद्ध नाहीत. आपद्धर्म म्हणून मी त्यांना स्वीकार्य आहेत. मात्र कनिष्ठ वर्णीयांना उच्च वर्णीयांची कर्म आपद्धर्म म्हणून देखील स्वीकार्य नाहीत... आता अधिक शास्त्रचर्चा नको. शूद्रांना ती विहीत नाही आणि ती तुझी योग्यताही नाही.’’ या द्रोणाचार्यांच्या निर्णायक वक्तव्याने कर्णाच्या मस्तकात संतापाचा आगडोंब उसळतो. (९५)

तेव्हा कर्ण चार्वाकमुनींच्या आश्रमात जातो. चंद्रकेतूमुनी त्याचे स्वागत करून ‘‘लोकायतदर्शन हेच मूळ एतद्देशीय तत्त्वज्ञान आहे, पंचनद प्रदेशापलीकडून आलेल्या

कुठलीही विद्या ग्रहण करण्याचा तुला तेवढाच अधिकार आहे. वर्णश्रेष्ठत्वाचा हा अहंकार काळाच्या कसोटीवर नाही.

आर्यांनीही त्याचा स्वीकार केला; तथापि स्वत:ला उच्चवर्णीय म्हणवणाऱ्या वैदिक ब्राह्मणांनी वेदांचं अवडंबर माजवलं. धर्मसत्ता हाती घेऊन राजसत्तेला दावणीला बांधलं... आपण सूतपुत्र आहोत की क्षत्रिय आहोत या प्रश्नांच्या भोवऱ्यात व्यर्थ गुंतू नकोस. कुठलीही विद्या ग्रहण करण्याचा तुला तेवढाच अधिकार आहे. वर्णश्रेष्ठत्वाचा हा अहंकार काळाच्या कसोटीवर टिकणार नाही. कर्णाचा कीर्तिसुगंध जगात दरवळत राहील, आणि आचार्य द्रोणांची आठवण एकलव्यासारख्या असामान्य धनुर्धराचा अंगठा तोडून घेणारा शिष्यवंचक गुरू आणि कर्णासारख्या असामान्य वीराची उपेक्षा करणारा कद्रू माणूस म्हणूनच काढली जाईल.'' (१०१) असे सांगतात.

चार्वाकपंथीय चंद्रकेतूच्या या प्रतिपादनाने कर्णाचा आत्मविश्वास जागा होतो; आणि तो परशुरामांकडे धनुर्विद्येतील रहस्ये हस्तगत करण्यासाठी जाण्याचे ठरवतो. महेंद्र पर्वतावर तो जातो आणि भृगुकुलोत्पन्न ब्राह्मण भार्गव म्हणून स्वत:ची ओळख करून देतो. त्याची विद्यासाधना चालू होते. पण एकदा कर्णाच्या उजव्या मांडीवर परशुराम मुनी निद्रिस्त झाले असता एक कीटक कर्णाच्या उजव्या मांडीखाली शिरून कडकडून चावा घेतो. रक्त वाहू लागते तरीही कर्ण स्थिर राहतो. ''एवढी तितिक्षा? एवढ सहनशीलता? तू निश्चितच ब्राह्मणकुलोत्पन्न नाहीस.'' असे परशुराम म्हणतात तेव्हा कर्णाला आपली ओळख देणे भाग पडते. ''कपटानं मिळवलेली ही विद्या तुला लाभणार नाही'' असा शाप ते देतात...(१०९)

पांडव इंद्रप्रस्थ नगरीत राजसूय यज्ञाचा जंगी घाट घालतात. अग्रपूजेचा मान श्रीकृष्णाला देण्यात आल्याने शिशुपाल यज्ञमंडपाचा त्याग करण्यास सर्वांना उद्युक्त करू पाहतो. कृष्णाला तो युद्धाचं आव्हान देतो. तेव्हा श्रीकृष्ण त्या यज्ञात पहिली आहुती म्हणून शिशुपालाचं मस्तक सुदर्शन चक्रानं धडावेगळं करतो. (१२४) मयसभेत दुर्योधनाची फजिती होते आणि द्रौपदी त्याला हसते. त्या अपमानाचं शल्य उरी बाळगून दुर्योधन त्रागा करतो. शकुनीमामा धर्माला द्यूत खेळायचं आव्हान देऊन त्याचं राजवैभव लुबाडण्याची कल्पना दुर्योधनाच्या मनात भरवतो. धृतराष्ट्र दुर्योधनाला समजावू पाहतो,''पांडवांचा द्वेष करू नकोस. त्यातून दु:खा खेरीज काहीच निष्पन्न होणार नाही, तेही तुझे बंधूच आहेत त्यांचा द्वेष करू नकोस.'' (१३३)

परंतु दुर्योधन द्यूतगृह उभारण्याची कल्पना त्यांच्या गळी उतरवतो. (१३६) कर्ण या सर्व प्रकाराबद्दल अनभिज्ञ असतो. द्यूतात शत्रूला जिंकणं हे त्याला पटत नाही; पण दुर्योधन त्याचं मत हसण्यावारी नेतो... द्यूतात हरलेल्या द्रौपदीला उद्देशून कर्ण म्हणतो... दु:शासना, तू भीमाची भीती बाळगू नकोस. तुझं रक्षण करायला मी समर्थ आहे, दास झालेल्या द्रौपदीला सांग की निर्वीर्य पतींचा त्याग करून तू आता दुसरे पती कर... '' भीम कर्णाला सुनावतो,'' सूतपुत्रा, कौरवांच्या तुकड्यावर जगणाऱ्या कुत्र्या, जिभेला आवर घाल. नाहीतर गदेच्या प्रहारानं याच क्षणी तुझं मस्तक–''

''अर्जुन जिवंत आहे तोपर्यंत मी मद्यमांस यांना स्पर्श करणार नाही की कोणा वाचकाला विन्मुख परत पाठवणार नाही''

पांडवांना नंतर तेरा वर्षांच्या वनवासाला जाणे भाग पडते. (१६१)

द्रौपदीच्या अपमानात कर्णाला स्वत:च्या अपमानाचे उट्टे निघाल्यासारखे वाटते. कर्णाचे आयुष्य दुर्योधनाच्या इच्छेशी बांधले गेलेले असल्याने कौरवांना साथ देणे त्याला भागच असते. कुरुसभेत कर्ण दिग्विजयाची घोषणा करतो (१९३) त्याचा जैत्ररथ विराट सेनेच्या अग्रभागी उभा राहतो. (१९५) भगदत्ताच्या कपाळावरची कापडी पट्टी भेदून त्याला आंधळ कर ही सूचना कर्ण फेटाळून लावतो,

''कर्ण अधर्मयुद्ध करीत नाही.'' असे कर्ण निर्धाराने सांगतो (१९९)

चंपानगरीत कर्णराजाचे स्वागत होते. पण मद्रराज शल्य कर्णाला निरोप पाठवतो,''तुझ्यापेक्षा जन्माने श्रेष्ठ असलेल्या आव्हान देण्याचं औद्धत्य करू नकोस. मरायची इच्छा नसेल तर आलास तसा चालता हो.'' (२०५) घनघोर युद्ध होऊन कर्णाची सरशी होते. मद्रराजाच्या पराभवाने वायव्य प्रदेशातील अनेक जमाती कर्णाचं आधिपत्य स्वीकारतात. दिग्विजयी कर्णाचे हस्तिनापूरमध्ये जोरदार स्वागत होते. दुर्योधन म्हणतो, ''अंगराज, माझा खरा मित्र तूच. तुझ्या या पराक्रमाला तुलना नाही.'' रात्री दुर्योधनाशी द्यूत खेळताना दुर्योधनाची पत्नी भानुमती म्हणते, ''युवराज हरला तर मी गळ्यातला रत्नहार देईन.'' (२०८) जिंकलेला कर्ण भानुमतीच्या गळ्यातून रत्नहार खेचू पाहतो तेव्हा तो तुटून रत्नं सगळीकडे विखुरतात. दुर्योधनाला कर्ण सांगतो, ''तुझे हे हात रत्नांचे खडे वेचण्यासाठी नाहीत.'' (२१०)

पिता जिवंत असताना राजसूय यज्ञ करता येत नाही, म्हणून दुर्योधन वैष्णवयाग करण्याचा घाट घालतो. पण पांडवांच्या राजसूय यज्ञापेक्षा तो फारच छोटेखानी असतो. तरीही कर्ण अर्जुनवधाच्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार करतो. ''अर्जुन जिवंत आहे तोपर्यंत मी मद्यमांस यांना स्पर्श करणार नाही की कोणा याचकाला विन्मुख परत पाठवणार नाही.'' असेही तो जाहीर करतो. (२१३) द्यूतात ठरलेल्या अटी पूर्ण झाल्यावर युधिष्ठिर दूत पाठवून आर्यधर्मानुसार आपलं राज्य आपल्याला परत मिळावं अशी मागणी करतो. तेव्हा कर्ण त्याला विरोध करताना म्हणतो,'' कुरुराज्यावर फक्त कौरवांचाच हक्क आहे... कारण तेच फक्त कुरूंचे वंशज आहेत.''

तेरा वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच पांडव प्रकट झाले आहेत. शब्द मोडल्याबद्दल त्यांनी आधी बारा वर्षांचा वनवास स्वीकारावा.'' (२३१) या युक्तिवादावर भीष्म सौरवर्षाऐवजी चांद्रवर्षाप्रमाणे अज्ञातवासाचा अवधी पूर्ण झालेला आहे हे ठणकावून सांगतात. कर्ण हा रोज पांडववधाच्या वल्गना करत असतो, तो कौरवांना विनाशाकडे घेऊन चालला आहे असा इशारा पितामह भीष्म देतात, पण त्याकडे दुर्योधन दुर्लक्ष करतो. उलट तो गर्जना करतो, ''मी जिवंत असेपर्यंत कुंतीच्या या अनौरस पुत्रांची सावलीही हस्तिनापूरच्या राजसिंहासनावर पडू देणार नाही. पाच गावंच काय पण सुईच्या अग्रावर मावेल एवढी सुद्धा जमीन मी

''मी सूतपुत्र की क्षत्रिय? राधेय कर्ण की ज्येष्ठ पांडव?की एका विराट सूडचक्राचा एक यःकश्चित आरा?''

त्यांना देणार नाही.'' (२४१)

युद्ध टाळण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून श्रीकृष्ण शिष्टाईसाठी येतो. त्याची शिष्टाई असफल ठरते. पण कृष्ण कर्जाला म्हणतो, ''मला तुझी एकदा भेट घ्यायची आहे.'

कृष्ण त्याला घेऊन गंगेवर जातो. ''आज तुझ्याकडून मला एक धर्मनिर्णय हवा आहे. ... आज मी तुला एक रहस्य सांगतो आहे. माझी आत्या, महाप्रतापी पांडवांची आई राजमाता कुंती हिचा तू ज्येष्ठ व कानीन पुत्र आहेस. आर्यधर्मानुसार तू पांडवांचा मोठा भाऊ आहेस... तुझी माता, राजमाता कुंती तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे.'' (२५७)

''कुरुकुलाच्या विनाशाला कारण झालेलं हे वैर तू संपवू शकतोस... तू मोठा भाऊ आहेस हे ठाऊक झाल्यावर पाचही पांडव लोळण घेत तुझ्या पायाशी येतील....'' (२५९)

त्यावर आताच हे नाते का आठवले यासारखे निरुत्तर करणारे सवाल कर्ण विचारतो. ''हे रहस्य रहस्यच राहू दे... दुर्योधनाने माझ्या बळावर युद्धाचा डाव मांडला आहे... त्याच्या ऋणातून मुक्त होण्याचे माझे भाग्य का हिरावून घेतोस?'' असे सांगून युद्ध टाळण्याची शक्यता फेटाळून लावतो. (२६०)

स्वत: कुंतीही कर्णाला भेटते. ''मला माझी सर्व मुलं हवी आहेत. तू माझ्याबरोबर चल. मी जगाला ओरडून सांगेन. कर्ण माझा थोरला मुलगा आहे म्हणून.''

''तू खूप सांगशील. पण जगाला पटले पाहिजे ना? लोक छी थू करतील माझी. जिवाच्या भीतीनं दुर्योधनाला सोडून गेला कर्ण म्हणतील. ती दुष्कीर्ती मला मरणाहून दु:खदायक होईल, राजमाते.'' (२७०)

कुंती कर्णाजवळ आपल्या पाचही मुलांना अभयदान मागते. तेव्हा कर्ण पुन्हा धर्मसंकटात सापडतो. तरीही तो म्हणतो, ''अर्जुन मेला तर माझ्यासह, आणि मी मेलो तर अर्जुनासह तुझी पाच मुलं जिवंत राहतील.'' (२७१)

प्रत्यक्ष युद्धात कर्ण द्विधाचित्तच राहतो. ''सूतपुत्र की क्षत्रिय? राधेय कर्ण की ज्येष्ठ पांडव? कोण आहे मी? आपण एका विराट सूडचक्रातील एक य:कश्चित आरा आहोत असे त्याला वाटते. आरंभी पितामह भीष्म त्याला रणांगणापासून दूर ठेवतात.

अरिष्टनेमी कर्णाला रोज सायंकाळी येऊन युद्धाची वार्ता सांगत राहतो. सेनापती भीष्म शरशय्येवर पडल्यावर कर्णाला सांगतात, ''राधेय नव्हे कौंतेय. माझ्या मनात तुझ्याबद्दल तिरस्कार कधीच नव्हता. मला तुझा अपमान करावा लागला याची कारणं वेगळी आहेत. तुला युद्धभूमीपासून दूर ठेवायचं तर तुझा अपमान करणं भागच होतं. तू दुर्योधनाचा खरा मित्र आहेस. माझा तुला आशीर्वाद आहे. त्याचं रक्षण कर. मनात द्वेष न ठेवता युद्ध कर. कीर्तिवंत हो.'' (३०४)

युद्धाच्या अकराव्या दिवशी सेनापती म्हणून द्रोणाचार्य रणांगणावर येतात.

नाही,हे धर्मयुद्ध नाही. सायंकाळ झाल्यावर युद्ध थांबवायचं असं ठरवून देखील रात्रीही युद्ध सुरूच ठेवायचं यालाच का धर्मयुद्ध म्हणायचं?

तेराव्या दिवशी भीमाशी लढताना कर्ण घायाळ होतो.

चौदाव्या दिवशी अर्जुन व कर्ण पुन्हा समोरासमोर येतात. अश्वत्थामा पडल्याची वार्ता कानावर येताच द्रोणाचार्य शस्त्र टाकतात. कर्णाची सेनापतीपदी नियुक्ती होते. ''कृष्णासह पांडवांचा नि:पात करीन अशी माझी प्रतिज्ञा आहे.'' (३४८)

कर्णाचं सारथ्य करण्याची कामगिरी शल्यावर सोपवण्यात येते. तेव्हा शल्य सांगतो, ''सारथ्य करताना मला जे उचित वाटेल ते मी बोललो तर कर्णानं ते सहन केलं पाहिजे.'' कर्ण ती अट मान्य करतो. शल्य त्या अटीच्या बळावर कर्णाचा हवा तसा पाण उतारा करतो.

वरवर मैत्रीचा आव आणणारा तू अंत:स्थ शत्रू आहेस असे कर्ण त्याला म्हणतो. दुर्योधनासाठी तो शल्याचे हे असले कुजके बोलणे सहन करतो.

अर्जुन आणि कर्ण यांच्यातील लढाई हा महाभारतीय युद्धातला महत्त्वपूर्ण प्रसंग. अर्जुन कर्णाचं कवच तोडतो. बाणांनी त्याला घायाळ करतो. कर्ण मूर्च्छित होतो तेव्हा अर्जुन हात मागे घेतो. कृष्ण त्याला सांगतो, ''शत्रूवर आलेलं संकट हीच संधी साधून त्याचा नाश कर.''

कर्णाच्या रथाचं डावं चाक जमिनीत रुतून बसते. त्याला रथावरून खाली उतरावे लागते. कर्ण अर्जुनाला क्षत्रियधर्माची आण घालतो, पण कृष्ण त्याच्या धर्मकृत्यांचा पाढा वाचून जन्मभर अधर्माचरण करणाऱ्या कर्णाने या क्षणी धर्माच्या नावाने कंठशोष करू नये असे बजावतो. (३६५) कृष्णाने पुढे केलेला अर्धचंद्राकृती आंचलिक बाण अर्जुन कर्णावर सोडतो आणि कर्णाचे मस्तक जमिनीवर कोसळते. (३६६)

कौरव-पांडव युद्ध हे धर्मयुद्ध आहे की अधर्मयुद्ध असा प्रश्न कर्ण स्वत:लाच विचारतो. ''नाही हे धर्मयुद्ध नाही. त्यक्तशस्त्र योद्ध्यांना ठार करायचं, युद्धरत योद्ध्याचा हात तोडायचा, सायंकाळ झाल्यावर युद्ध थांबवायचं असं ठरवून देखील रात्रीही युद्ध सुरूच ठेवायचं यालाच का धर्मयुद्ध म्हणायचं? म्हणे, यतो कृष्णस्ततो धर्म: आणि यतो धर्म: ततो जय: की यतो जय: ततो धर्म:? यतो जय: ततो कृष्ण:? धर्म जिंकतो की जिंकला तोच धर्म ठरतो? ते काही असो, यतो दुर्योधन स्ततो कर्ण:''

कर्णाला धर्मयुद्ध म्हणजे काय असा प्रश्न पडतो, आणि जो जिंकतो तो धर्म-अधर्म ठरवतो हे सत्य उमगते.

रवीन्द्र ठाकूर यांनाही अभिप्रेत असणारी हीच विचारधारा असावी. त्यांनी तिचा पुनरुच्चार कृष्णाद्वारेही घडवला आहे.

कौरव-पांडव यांच्या युद्धाबद्दलची आपली भूमिकाच जणू कृष्णाच्या मुखातून ते विशद करतात. ''आता मी काय सांगतो तेही थोडं ऐक. धर्म देखील बलवंतांनाच साथ देतो. भर सभेत तुम्ही द्रौपदीची विटंबना केलीत त्या प्रसंगी पितामह काय म्हणाले होते

आम्ही धर्मयुद्ध करायला निघालो होतो हे तुला कोणी सांगितलं? युद्ध हे कधीही धर्मयुद्ध नसतं, दुर्योधन. युद्धात उतरायचं असतं ते फक्त जिंकण्यासाठी.

ते थोडं आठव. एरव्ही बलवान सांगतील तोच धर्म आणि ते आचरतील तीच नीती; हाच जगाचा न्याय असतो. तुझ्या दृष्टीनं तू धर्मयुद्ध केलंही असशील. पण आम्ही धर्मयुद्ध करायला निघालो होतो हे तुला कोणी सांगितलं? युद्ध हे कधीही धर्मयुद्ध नसतं, दुर्योधन. युद्धात उतरायचं असतं ते फक्त जिंकण्यासाठी. तुझं नाव दुर्योधन असूनही हा साधा युद्धधर्म तुला कधी कळलाच नाही.... कपटाचा अवलंब केला नसता तर पांडवांना विजय मिळालाच नसता. आता आम्ही सांगू तोच धर्म आणि आम्ही जिचं आचरण करू तीच नीती ठरेल.'' (३६९)

कपट केलं नसतं तर पांडवांना जय मिळाला नसता असे विधान कृष्णाच्या तोंडी टाकून रवीन्द्र ठाकूर यांनी आपल्या भूमिकेचे आणि महाभारत कथा कर्णाच्या दृष्टिकोनातून मांडण्याचे प्रयोजनच व्यक्त केले आहे. ते कोणाला पटेल, न पटेल. भैरप्पांच्या 'पर्व' मधील मानवी नात्यांचा व्यामिश्र गोफ आपल्याला भयचकित करतो. ठाकूर काही विशिष्ट व्यक्तींच्या संदर्भात विशिष्ट भूमिकेची जाणीवपूर्वक योजना करतात. कर्णाची वर्णाश्रम कल्पनांमुळे झालेली घुसमट, ज्ञानक्षेत्रातील ब्राह्मणांची मक्तेदारी, आर्यावर्तातील क्षत्रियांमध्ये चार्वाक वा बहिस्पत्य-म्हणजे लोकायत मताचा असणारा प्रभाव - याबद्दल ठाकूर यांचा आग्रही सूर आहे. महाभारताची कर्णाच्या व्यक्तिरेखेच्या अनुषंगाने केलेली ही मांडणी 'मृत्युंजयच्या वळणावरच भिरभिरत राहते.

मोजक्या प्रसंगांतून महाभारतातील कथासूत्राचा प्रशस्त आवाका पकडणे हे सोपे काम नव्हे. संस्कृतप्रचुर भाषाविलासही वाचकांना खिळवून ठेवणारा वाटेल.

महाभारताचे आकर्षण हे आजच्या तरुण लेखकांनाही किती विलक्षण आहे - याची प्रचीती 'धर्मयुद्ध' सारख्या कृती देतात. धर्म आणि अधर्म या संज्ञा अर्थपूर्ण मानायच्या की निरर्थक - हे आपल्या आकलनावर आणि निकषांवर ठरते. ठाकूर यांची कर्णाबद्दलची भावना ही उपेक्षित अन्यायग्रस्त व्यक्तीचा पाठपुरावा करणारी आहे. वाचकांना ती रुचेल व पचेल.

पृष्ठे : ३७६ किंमत : २५० रु. सभासदांना : १८८ रु. पोस्टेज : २५ रु.

इतिहासाच्या पडद्याआड दडलेल्या,
स्वतेजानं लखलखणाऱ्या व्यक्तींच्या जीवनावरील पुस्तके...

राधेय	रणजित देसाई	११०/-
पावनखिंड	रणजित देसाई	१००/-
चाणक्य	भा. द. खेर	२५०/-
शापित राजहंस	अनंत तिबिले	२५०/-



एक्झोडस

मूळ लेखक : लिऑन युरिस
अनुवाद : बाळ भागवत

इझ्राएलच्या स्थापनेसाठी ज्यूंनी वर्षानुवर्षे केलेला संघर्ष

अमेरिकेतील बेस्टसेलर कादंबरीकारांमध्ये ज्याची गणना होते त्या लिऑन युरिस याची सर्वात जास्त गाजलेली कादंबरी 'एक्झोडस' आता मराठीत उपलब्ध झाली आहे. इझ्राएल या राष्ट्राच्या स्थापनेची आणि अरब राष्ट्रांनी चारी बाजूंनी वेढलेले असताना आपले अस्तित्व टिकवून धरण्यासाठी जगभरच्या ज्यू लोकांनी दिलेल्या प्रचंड झुंजीची कहाणी ऊर्जस्वल शैलीत सांगणारी 'एक्झोडस' ही कादंबरी चित्रपटाच्या माध्यमातूनही लक्षावधी प्रेक्षकांना झपाटून टाकणारी ठरली. गॉन वुइथ दि वुइंड या कादंबरीने व चित्रपटाने मिळवलेला यशाची बरोबरी करणारी लिऑन युरिस याची ही कादंबरी मराठी वाचकांना विशेष आवडेल. इझ्राएल या चिमुकल्या राष्ट्राने अरब सत्ताधीशांशी ज्या रीतीने टक्कर दिली आहे, त्याबद्दल आपल्या भारतीयांना अभिमान वाटतो, दहशतवादाशी मुकाबला करण्यात इझ्राएलने जे धैर्य व धाडस दाखवले त्याचाही आपल्याला नेहमीच हेवा वाटत आला आहे. एन्टेबी विमानतळावर अपहरणकर्त्यांना ज्याप्रकारे इझ्राएल कमांडोंनी धडा शिकवला; तो प्रकार आपल्यालाही काश्मीरात का जमू नये याचे शल्य अनेक भारतीयांना वाटते.

इझ्राएल या राष्ट्राच्या निर्मितीची कहाणी सांगणारी कादंबरी असे म्हटले की ती खूप माहितीवजा असणार असा ग्रह होतो; पण ही कहाणी म्हणजे इतिहासाचे पुस्तक नव्हे, तर काही पात्रांच्या अनुषंगाने मोजक्या घटनांच्या माध्यमातून इझ्राएलच्या स्वातंत्र्य संपादनातले रोमहर्षक नाट्य पकडण्याचे कौशल्य लिऑन युरिसने दाखवले आहे, इतिहासाचा भाग कथानकात येतो, परंतु ऐतिहासिक कादंबरी म्हटल्यावर आपल्यापुढे जो आकृतिबंध उभा राहतो, त्यापेक्षा ही कलाकृती वेगळी आहे. एक कादंबरी म्हणूनच ही कलाकृती आपल्या मनावर ठासून राहते. या कादंबरीतील पात्रांची संख्या तशी पन्नासाच्या घरात जाते, परंतु मुख्य पात्रे मोजकीच आहेत; आणि वेगवेगळ्या घटनांचे ते प्रवर्तक किंवा साक्षीदार असतात. त्या इतिहासातले ते जबाबदार घटक असतात.

इझ्राएल-अरब संघर्षामध्ये युद्ध पत्रकार म्हणून लिऑन युरिसने १९५६ साली काम केले. त्याकाळात त्याने अरब इझ्राएल संघर्षाचा खोलात जाऊन अभ्यास केला. त्यातूनच 'एक्झोडस'ची रचना झाली.

मला येथून किमान ३०० लोकांना बाहेर काढायचे आहे.त्यासाठी मला ब्रिटिश युनिफॉर्म, कागदपत्रे, हवी आहेत.

पाच भागात एकूण ८७ प्रकरणांमध्ये कथानकाची मांडणी केली गेली आहे.

कादंबरीचा आरंभ होतो तो अमेरिकन पत्रकार मार्क पार्कर याच्या सायप्रस विमानतळावरील आगमनाने. तो किटी फ्रेमांट या आपल्या परिचित परिचारिकेला भेटायला आलेला असतो. या भेटीचे खास कारण म्हणजे किटीच्या नवऱ्याचे युद्धभूमीवर निधन झाल्याने तिचे सांत्वन करणे. विमानतळावर मार्कची कसून तपासणी होते. बरोबर काय आणले आहे असा प्रश्न कस्टम ऑफिसर करतो तेव्हा मार्क उत्तर देतो, ''दोन पौंड शुद्ध हेरॉइन आणि अश्लील चित्रांचे एक पुस्तक.'' तेव्हा तो कस्टम ऑफिसर सगळेच अमेरिकन विनोदी असतात की काय असा विचार करत त्याला पुढे पाठवतो. पर्यटन विभागाची एक सेविका मार्कला किटी फ्रेमॉंटचा निरोप देते- ''कायरेनियामधील डोम हॉटेलवर आपण जावे. तेथे खोली राखून ठेवली आहे.'' तसेच त्याच्यासाठी गाडीची व्यवस्थाही असते.

कॅथरीन फ्रेमॉन्ट व तिचा नवरा टॉम या दोघांशी मार्क पार्करचे अत्यंत जवळचे संबंध. शाळेत व कॉलेजात ते सहाध्यायी होते. कॉलेजात असताना टॉम आणि किटी, तसेच मार्क आणि एलेन यांचे लग्न होते. मार्क आणि एलेन यांचे लग्न लौकरच मोडीत निघाले. मार्कने पत्रकार महणून अनेक ठिकाणी नोकऱ्या केल्या. १९३८ मध्ये अमेरिकन न्यूज सिंडिकेटचा प्रतिनिधी म्हणून बर्लिनमध्ये तो काम करू लागला. आणि त्याच्या वार्तापत्रांनी त्याचे नाव सर्वदूर आदराला पात्र झाले. १९४२ मध्ये टॉम फ्रेमॉन्ट नौदलात भरती झाला. ग्वाडाइकनालच्या चढाईत मारला गेला. टॉमची मुलगी सँड्रा ही देखील पोलिओला बळी पडली. तेव्हा विमनस्क किटीने परिचारिकेचा पेशा पत्करून दु:खीकष्टी लोकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा निर्णय घेतला. ग्रीसमध्ये अनाथ मुलांकरिता जीव तोडून काम करणारी अमेरिकन नर्स म्हणून तिची सर्वत्र ख्याती पसरली. ती रजा घेऊन सायप्रसला गेल्याचे कळल्याने मार्क मुद्दाम तिला भेटायला येतो; येथून या कादंबरीचा प्रारंभ होतो. १९४६ मध्ये.

कायरेनियात डोम हॉटेलमध्ये गेल्यावर ब्रिटिश सैन्याधिकारी मेजर फ्रेड कॉल्डवेल्ड त्याला भेटून, त्याची चौकशी करतो. ''तू इथे का आलास हे आम्हाला कळायला हवे.'' तेव्हा आपण किटी फ्रेमॉन्टला भेटायला आलोय; गेली २५ वर्षे आपण तिला ओळखतो, आता रजेवर आलोय असे सांगून मार्क त्याची बोळवण करतो.

किटी आणि मार्क यांच्या भेटीत गतजीवनातल्या घटनांची उजळणी होते. टॉमच्या मृत्यूने तिला धक्का बसलेला असतो. काही काळ ती न्यूयॉर्कला राहते. खूप मद्यपान करून दु:ख विसरू पाहते. आत्महत्येचे बेत घोळवू लागते. पण धीर होत नाही. तेव्हा सोलोनियाच्या ब्रिटिश मिशनच्या ताब्यातील अनाथाश्रमाचा ताबा घेऊन त्यातील मुलांची ती देखभाल करते. तिच्या कामावर सर्वजण खूष असतात. आता सायप्रसमध्ये एका कॅम्पचा ताबा तिने घ्यावा अशी तिला विनंती करण्यात येते. कर्नल हार्वर्ड हिलिंग्ज हा तिच्या प्रेमात पडतो.

दोन हजार वर्षांपूर्वी बार कोखवा येथे रोमन सत्तेशी संघर्ष करून किंगडम ऑफ ज्युडाची स्थापना केली गेली..

मार्क तिला म्हणतो, ''किटी, तू २८ वर्षाची आहेस. तू लग्नाचा विचार का करत नाहीस? ती म्हणते, ''माझे टॉमवर फार प्रेम होते. तसे मला कुणाबद्दल पुन्हा वाटणार नाही.'' मार्कच्या पॅलेस्टाइन दौऱ्याबद्दल ती माहिती विचारते. दोन हजार वर्षे मृत असलेला देश पुन्हा उभा करायच्या कल्पनेने भारलेले ज्यू लोक-त्याच्या कौतुकाचा व आदराचा विषय असतात. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या ताब्यात तो प्रदेश असतो. आणि ज्यूंचे स्वतंत्र राष्ट्र व्हावे असा ठराव ब्रिटिश पार्लमेंटने केलेला असतो. परंतु ज्यूंबद्दल ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मनात प्रेम असतेच असे नाही.

या नव्याने स्थापन होणाऱ्या देशात कमीत कमी ज्यूंना येऊ द्यायचे असा ब्रिटिशांचा प्रयत्न असतो. त्या उलट ज्यूंच्या मोसाद आलिया बेत या संघटनेचा डाव असतो तो जास्तीत जास्त ज्यू चोरूनमारून का होईना पॅलेस्टाइनमध्ये पोचवायचे. मोसादच्या या बोटी ब्रिटिश रॉयल नेव्हीच्या हाती पडल्या तर त्यावरील सर्व प्रवाशांची रवानगी सायप्रसमधल्या छावण्यात होई. त्या छावण्यांत मुलेही असत.

जास्तीत जास्त ज्यूंना पॅलेस्टाइनमध्ये आणायचे म्हणून काम करणाऱ्या मोसादचा एक अग्रगण्य नेता आरी बेन कनान आणि डेव्हिड बेन अमी यांची चांगली दोस्ती असते. आरी म्हणतो, ''या छावण्यातील निर्वासितांना पळून जाण्यास मदत करण्यासाठी मला पाठवलेले आहे. मला येथून किमान ३०० लोकांना बाहेर काढायचे आहे. त्यासाठी मला ब्रिटिश युनिफॉर्म, कागदपत्रे, हवी आहेत. मान्द्रिया या ग्रीक माणसाची शिपिंग कंपनी असते. टॅक्सीचा व्यवसाय असतो. तीनशे माणसांना पुरेल असे एखादे जुने जहाज खरेदी करण्याचे काम आरी बेन कनान मान्द्रियावर सोपवतो.'' मांद्रिया म्हणतो, ''आम्ही सायप्रसचे लोक तुमच्या बरोबर आहोत. तुमची लढाई ती आमचीही लढाई.''

आरी बेन कनानची बहीण यार्देना हिच्यावर डेव्हिड बेन अमीचे प्रेम असते. तिचे पत्र आरी डेव्हिडला देतो. ''माझ्या बहिणीने तुझ्यात एवढे काय पाहिले ते मला कळत नाही. पण तुझ्यावर तिचे प्रेम आहे खरे.''

डेव्हिडला आपल्या योजना आरी सांगतो. ''आता युद्ध अटळ आहे. बॉंबफेक, गोळीबार, आपले अस्तित्व संपणार असे वाटते.'' ती वेळ निभावते. पुन्हा तसेच हातात झाडू धरून बंदूक चालवायचे शिक्षण देऊन आम्ही सैन्य तयार करतो.''

आरी बेन कनान डेव्हिडहून उंच असतो. ''चार हजार वर्षापूर्वी सुरू झालेलया कथानकाचे एक प्रकरण मी पुढे नेतो आहे... दोन हजार वर्षांपूर्वी बार कोखवा येथे रोमन सत्तेशी संघर्ष करून किंगडम ऑफ ज्युडाची स्थापना केली गेली...आज त्याच ठिकाणी उभं राहून आपण ब्रिटिशांशी लढा देत आहोत'' बार कोरबळाच्या बंडानंतर रोमन लोक परत मोठे सैन्य घेऊन आले त्यांनी आपल्या लोकांची कत्तल करून सर्व शहरे पुन्हा जिंकली आपल्या मुलांच्या व स्त्रियांच्या रक्ताने नद्या भरल्या. लालभडक झाल्या. ज्यूंचा नेता अकिवा याची कातडी सोलून काढण्यात आली. त्याची धिंड निघाली. त्याला सिंहाच्या

''रोमन गेले, ग्रीक गेले. हिटलर गेला. आपला नायनाट करू पाहणारे सर्वजण स्वतःच नष्ट झाले..

तोंडी देण्यात आले. बायबलमध्ये अशा कितीतरी गोष्टी आहेत... आपले अस्तित्व अजून शिल्लक आहे. रोमन गेले, ग्रीक गेले. हिटलर गेला. आपला नायनाट करू पाहणारे सर्वजण स्वत:च नष्ट झाले... ब्रिटिश साम्राज्याचाही नाश होईल. हा चमत्कार नक्की घडेल.''

मांद्रिया आरीच्या सांगण्याप्रमाणे एक जुने जहाज विकत घेतो, आणि त्याला एक्झोडस असे नवे नाव देतो. जहाजाची दुरुस्ती करून त्यावरून तो छावणीतील तीनशे मुलांना इझाएलला पळवून नेण्याची योजना आखतो.

आरी या योजनेची माहिती पत्रकार मार्क पार्करला देतो आणि या प्रकरणाला प्रसिद्धी देऊन 'पॅलेस्टाइनमध्ये ज्यूंच्या प्रवेशावर आळा घालण्याच्या ब्रिटिश धोरणाची फेरतपासणी व्हावी' म्हणून जागतिक पातळीवर वातावरण निर्माण करण्यास हातभार लावावा अशी विनंती करतो. कायरेनिया बंदरात या तीनशे मुलांना जहाजावर चढवल्यावर ब्रिटिश अधिकारी ते जहाज येथेच रोखून धरतील, हे नक्की. त्या आधीच ती बातमी न्यूयॉर्क वा पॅरिस येथे तयार असली तर ती लगेच प्रसिद्ध होऊन मार्कला त्या बातमीचे श्रेय मिळणे अटळ होते.

मार्क या योजनेला संमती देतो. मार्कने त्याबद्दलची बातमी आधीच लिहून सायप्रसमधून चोरून बाहेर पाठवायची; सांकेतिक संदेश दिल्यावर वृत्तपत्रांनी ती छापायची अशीही व्यूहरचना केली जाते. किटी फ्रेमॉन्ट हिने या जहाजावर त्या मुलांबरोबर राहावे म्हणून तिचे मन वळवण्यात येते. ती ख्रिश्चन असल्याने ब्रिटिश अधिकारी तिला अडवणार नाहीत असाही एक आडाखा. आरी बेन कनान याच्या युक्तिवादामुळे किटी अनाथ मुलांच्या आश्रमाला भेट देऊन तेथील परिस्थिती पाहून त्या मुलांची सुटका होणे कितपत गरजेचे आहे हे देखील ठरवण्याचा अधिकार घेते.

त्या मुलांबरोबर काम करणाऱ्या कारेनची व तिची गाठ पडते. कारेनने १९३८ मध्ये वयाच्या ७व्या वर्षी हिटलरच्या ज्यू द्वेषाचा नंगानाच बघितलेला असतो. जर्मनीतील ज्यूंवर पंधरा कोटी डॉलर्सचा दंड बसवलेला गेला. २० ज्यूंना अटकेत टाकलेले. ८००० ज्यूंची दुकाने लुटलेली... कारेनला आरी बेन कनानच्या मदतीने जर्मनीबाहेर नेण्याची व्यवस्था तिचे आईवडील करतात. तिला डेन्मार्कमधल्या एका कुटुंबात ठेवण्यात येते. परंतु डेन्मार्क जर्मन सैन्याच्या ताब्यात गेल्यावर तीला स्वीडन, बेल्जियम, करीत पॅलेस्टाइनला जाण्याचे ठरवले. मोसाद आलिया बेन या संघटनेच्या मदतीने एका जुन्या बोटीवरून ती गुप्तपणे प्रवास करून पॅलेस्टाइनकडे निघते. पण तिला सायप्रसमध्ये छावणीत राहणे भाग पडते. कॅरेलॉसच्या मुलांच्या कँपमध्ये तिला काम करायला ठेवले जाते. (पृष्ठ ६० ते २०० मध्ये हे तिचे पूर्ववृत्त येते.)

आरी बेन कनान खोटी कागदपत्रे करून, ब्रिटिश सैन्याची एक तोतया तुकडीच अस्तित्वात आणतो आणि ब्रिटिश युनिफॉर्म व दारूगोळा मिळवून, तीनशे मुलांच्या वाहतुकीसाठी लष्करी ट्रक्स मिळवतो. त्याचे हे धाडस अचाटच! तेथील ब्रिटिश गुप्तहेर

मार्कची बातमी जगभराच्या वृत्तपत्रात छापून येते आणि ब्रिटिशांची जगभर नाचक्की होते. ''माझ्या लोकांना जाऊ दे.'' हीच त्यांची मागणी असते.

खात्यालाही आरी बेन कनानच्या या कारस्थानाचा पत्ता लागत नाही. इतके सगळे काम बिनबोभाट चाललेले असते. कॅरलॉसच्या ज्यू कँपमध्ये काहीतरी हालचाल चालू आहे, एवढेच त्यांना दिसते. पण तिच्यात बेकायदेशीर असे काही त्यांना आढळत नाही.

मार्क आपली बातमी ''एका वैमानिकाबरोबर लंडनच्या एएसएस वृत्तसंस्थेत पाठवतो आणि 'पाच दिवसांनी तार करीन. तिच्याखाली मार्क अशी सही असेल तर बातमी प्रसिद्ध करावी' अशी सूचनाही देऊन ठेवतो.

'एक्झोडस' हे जहाज ठरल्याप्रमाणे तीनशे मुलांना घेऊन निघण्यासाठी सज्ज होते. आणि ब्रिटिश अधिकारी ते अडवतात. मार्कची बातमी जगभरच्या वृत्तपत्रात छापून येते आणि ब्रिटिशांची जगभर नाचक्की होते. ''माझ्या लोकांना जाऊ दे'' हीच त्यांची मागणी असते. महात्मा गांधीजींच्या सत्याग्रह तत्त्वाचा अवलंब जहाजावर केला जातो. दोन आठवडे जातात तेव्हा जोपर्यंत आम्हाला पॅलेस्टाइनला जाऊ दिले जात नाही तोपर्यंत आम्ही अन्नसत्याग्रह करू असे मुले जाहीर करतात. त्या अन्नसत्याग्रहाचे वृत्तान्त तासातासाने उपोषण करणाऱ्या मुलांना देण्यात येतात. डेकवर आणून ठेवण्यात येते. मार्क आरी बेन कनानला म्हणतो, ''तू हैवान आहेस'' तेव्हा आरी बेन म्हणतो, ''या छोट्या मुलांची उपासमार करण्यात मला आनंद मिळतोय असे का तुला वाटते? रणगाडे आणि तोफा यांना तोंड द्यायला मजकडे काय आहे?'' ''आमच्याकडे शस्त्रे आहेत ती म्हणजे आमचा निर्धार, निश्चय आणि आत्मविश्वास. आम्ही करत आहोत ते बरोबर आहे. दोन हजार वर्षे आमच्यावर अनंत अत्याचार झाले. ही लढाई जिंकल्याशिवाय आम्ही राहणार नाही.''

''साठ लक्ष ज्यू गॅस चेंबरमध्ये मेले तेव्हा आपण का मरत आहोत हेच त्यांना कळत नव्हते. पण एक्झोडसवर तीनशे मृत्यू घडले तर त्याचे कारण आपल्यापैकी प्रत्येकाला ठाऊक असेल. जगालाही ठाऊक असेल.''

उद्यापासून दररोज दुपारी दहाजण ब्रिटिश सैन्यासमोर एक्झोडसच्या ब्रिजवर आत्मघात करून घेतील असे आरी बेन कनान जाहीर करतो. तेव्हा इंग्लंड, अमेरिका, पॅलेस्टाइनमध्ये एकच खळबळ उडते. ब्रिटिश सरकार तडजोडीला तयार होते.

एक्झोडसला शेवटी पॅलेस्टाइनला जायला परवानगी मिळते. परंतु येथे ही कादंबरी संपत नाही. तिचा पहिला भाग संपतो. त्यापुढच्या भागात १८८४ पासून ज्यू लोकांनी स्वत:च्या स्वतंत्र राष्ट्राची जी स्वप्ने घोळवलेली असतात, त्यांची अशीच चित्तथरारक कहाणी वाचायला मिळते. त्या काळात ज्यूंना स्वतंत्र वेगळी वस्ती करून राहणे भाग पडते. त्या 'घेटो' मधून बाहेर पडणे त्यांना जीवघेणे ठरू शकते. तरीही ज्यू लोकांच्या संघटना निर्माण होतात. ''ज्यूंच त्राता त्याची वेळ झाली की येईल आणि आपल्याला घेऊन जाईल.'' ही त्यांची श्रद्धा.

रशियात १८८१ मध्ये ज्यूंना ठार करा अशी लाट उठली. जोसी. रॉबिन्सकी, याकोब यांना सीरियात आश्रम घ्यावा लागला. फ्रान्स (१९८४.१८९७) मध्ये झायोनिझमची

उद्यापासून दररोज दुपारी दहाजण ब्रिटिश सैन्यासमोर एक्झोडसच्या ब्रिजवर आत्मघात करून घेतील असे आरी बेन कनान जाहीर करतो.

घोषणा करण्यात आली. उद्दिष्ट -कायद्याने पॅलेस्टाइनमध्ये ज्यूंचे राज्य स्थापन करणे.

१९०० सालापर्यंत ५० हजार ज्यू पॅलेस्टाइनला पोचले. पण ते शेतीत रस घेत नव्हते. व्यापार उद्योगात रस घेत. पण एवढ्या लोकांना पुरण्याएवढा व्यापार होता कुठे? तेव्हा जमीन लागवडीखाली आणणे भाग पडले पण त्यासाठी पाणी कुठे होते पुरेसे? ज्यूंचा शेतीत जम बसेना. त्यामुळे निराशेची लाट ज्यूंमध्ये पसरू लागली. पण तेथील दलदलीत पीक काढण्यायोग्य जमिनीची सिद्धता करून, छोटे छोटे कालवे खणून समाईक शेतीचा प्रयोग सुरू झाला. अरब व बदाऊन लोक या शेतीच्या चमत्काराने चकित झाले- ज्यूंना या नव्याने सुपीक झालेल्या जमिनीतून हुसकावून लावायचे बेत ते घोळवू लागले. ज्यूंच्या वस्तीवर हल्ले करू लागले. त्यामुळे ज्यू घेटो भोवती कडेकोट तटबंदी करून आपल्या बंदिस्त वस्त्यात राहू लागले.

बाल्फोर जाहीर नाम्याद्वारे ''ज्यूंसाठी पॅलेस्टाईनमध्ये देश मिळावा या मताला'' ब्रिटनने पाठिंबा जाहीर केला- कारण पहिल्या महायुद्धाच्या काळात अमेरिकेतल्या श्रीमंत ज्यूंचा पाठिंबा मिळवण्यासाठी ज्यूंच्या मागणीला मान्यता देणे अपरिहार्य ठरले. पन्नास देशांनी बॉल्फोरचा जाहीरनामा मान्य केला. फ्रान्स आणि ब्रिटन यांनी मध्यपूर्व आपापसात वाटून घेण्याचा साईक्स-पिकॉट गुह्य करार केला होता, तो झारच्या क्रांतिकारकांनी प्रसिद्ध केला तेव्हा ब्रिटनने आपला विश्वासघात केला असे अरबांना वाटले. सॅनरेनोच्या परिषदेत इंग्लंडने अरब भूमीचा सिंहाचा वाटा स्वतःला घेऊन फ्रान्सला सीरिया व मोसर्लच्या तेलखाणींमधली पाइपलाइन दिली- ब्रिटनने मध्यपूर्वेत आपले पाय भक्कम रोवले. तेथे कळसूत्री बाहुल्याप्रमाणे शेख सत्ताधीश नेमले.

पॅलेस्टाईनमध्ये बराक बेनकनान, डॉ. वाईझमन वगैरे ज्यू नेत्यांनी लोकशाही पद्धतीने आपले सरकार आणले. अरबांनी ज्यूंचा पॅलेस्टाईनला परतण्याचा ऐतिहासिक हक्क मान्य केला. ज्यू संस्कृती व हिब्रू यांचा स्वीकार केला. पॅलेस्टाईनमध्ये ज्यूंची भूमी असावी हा हक्क मानवतेच्या भूमिकेतून मान्य केला. परंतु अरबांनी आपले प्रातिनिधीक सरकार स्थापन करावे असे ब्रिटनने त्यांना सांगितले तेव्हा त्यांच्या आपापसातल्या भांडणांना ऊत आला, हाज अमीन एल हुसेनी हा जेरूसलेमचा मुफ्ती नेता बनला. (मुफ्ती - मोहमदाच्या वंशजांपैकी) त्याला मात्र ज्यूंनी पॅलेस्टाईनला परतावे हे मान्य नव्हते. त्याने ज्यू लोकांविरुद्धलढण्याची घोषणा केली- काही ज्यू त्यात बळी पडले. ब्रिटीशांनी हाज अमीनला दोषी धरले पण माफ केले. आणि पॅलेस्टाईनमध्ये परतणाऱ्या ज्यूंवर अनेक बंधने घातली. विन्स्टन चर्चिलने पॅलेस्टाईनच्या मॅंडेटनुसार ट्रान्सजॉर्डनची निर्मिती केली. ब्रिटिशांच्या दयाळूपणाचा बुडबुडा फुटला.

ज्यू नेत्यांनी एक गुप्त सभा घेतली. ब्रिटननेच ज्यूंच्या संरक्षणाची जबाबदारी घ्यावी असे डॉ. वाइझमनचे प्रतिपादन तर ज्यू शस्त्रसज्ज झाल्यास अरबांचा त्रास वाढेल अशी दुसऱ्या शांततप्रेमी गटाची भावना. अरबांचा तर्टकाळ बदला घ्या असे अकिबाचे मत. अरबांना बंदुकीचीच भाषा कळते. इशोव्ह सेंट्रल व झामोन सेटलमेंट सोसायटी यांनी

ब्रिटननेच ज्यूंच्या संरक्षणाची जबाबदारी घ्यावी असे डॉ. वाइझमनचे प्रतिपादन. जर ज्यू शस्त्रसज्ज झाल्यास अरबांचा त्रास वाढेल.

शेवटी शस्त्रसज्ज होऊन अरबांवर दडपण ठेवायचे आणि ब्रिटिशांशी वाटाघाटी चालू ठेवायच्या अशी दुहेरी नीती अवलंबण्याचे ठरवले. हॅगन्ना (आत्मसंरक्षक) सैन्य स्थापन केले गेले.

१९२० नंतर शंभरावर किबुंट्झ मध्ये राहणाऱ्या ५० हजार ज्यूंनी पाच लाख डुनेम जमीन लागवडीखाली आणली. दहा लाख झाडे लावली. किबुटझमध्ये सामुदायिक शेती व जीवन होते. ते नापसंत असणाऱ्यांनी मोशाव चळवळ सुरू करून स्वतःचे वेगळे शेत व घर यांचा आग्रह धरला. १९३० मध्ये अरब व ज्यू वसाहती यांच्यात दंगली झाल्या.

१९३३ मध्ये जर्मनीत हिटलर सत्तेवर आला. त्याने ज्यू विरोधी धोरण जाहीर केले. हिटलरच्या जर्मनीतून ज्यू लोक देशांतर करू लागले. पॅलेस्टाईनमध्येही बरेच ज्यू आले. त्यांच्या विरोधात अरब नेत्यांनी संप पुकारला. दंगली माजवल्या. पण ते प्रयत्न फसले. अरबांचा अनुनय करण्यासाठी ब्रिटिशांनी ज्यूंच्या पॅलेस्टाइन प्रवेशात अडथळे आणणे जारी ठेवले. इशोव्हने हॅगन्ना या सैन्यात २५हजार ज्यू तरुणांची भरती केली. हरेखाते कार्यक्षम केले. जगभर ज्यूंचे एजंट शस्त्रास्त्रे खरेदी करून पॅलेस्टाईनला गुप्तमार्गाने पोचवत. किबुटझमध्ये सैनिकी शिक्षण देण्यात येई.

आरी बेन कनान या तरूणाने आपल्या नेतृत्वगुणांनी हॅगन्नावर प्रभाव टाकला. सहाफुट उंच सिंहासारखा दणकट, शेतीत रमणारा, पॅलेस्टाईनचा इंच न इंच पायी तुडवून जुन्या इतिहासाचा छडा लावणारा, अरबांचे हल्ले परतवून नव्या वसाहतींचे रक्षण करण्यात तो आघाडीवर असे. ब्रिटीश अधिकारी मेजर माल्कम याच्या नेतृत्वाखाली अरब गुंडांचा बंदोबस्त करण्यासाठी आरीने गनिमी पथके तयार केली. ज्यूंनी आपल्या वस्तीबाहेर जाऊन अरबांवर आक्रमक हल्ला चढवून त्यांची शस्त्रास्त्रे हस्तगत करण्यात यश मिळविले. त्यामुळे ज्यूंचा दरारा वाढला. पीपी माल्कमला पॅलेस्टाईन सोडून जाण्याचा ब्रिटीश सरकारने आदेश दिला. पण त्यापूर्वी अरबांच्या बंदुकीचा कणा त्याने मोडून काढला.

दुसऱ्या भागात दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या घटनांची नोंद होते.

तिसऱ्या भागात एक्झोडस जहाजातून आलेल्या तीनशे मुलांचे स्वागत येथपासून कथानकाला गती येते. आरी बेन कनान, भूमिगत सैन्याचा प्रमुख अविदान, किटी, कारेन यांच्या समवेत पन्नास मुलांची रवानगी डाफना या दोन हजार फूट उंचावरच्या गावातील कँपात होते. यूथ आलिमाचे तेथे केंद्र असते. हॅरिएट सॉल्झ मन या अमेरिकन स्त्रीने जागोजाग रुग्ण सेवाकेंद्र त्याभागात उभी केलेली असतात.

२९ नोव्हेंबर १९४७ रोजी यूनोच्या आमसभेत पॅलेस्टाईनच्या फाळणीवर मतदान होते. आणि फाळणीच्या बाजूने ३३ मते मिळतात. अरबांच्या बाजूने फक्त तेरा मते. बहुसंख्य अरब राष्ट्रांनी ज्यूंना ठेचून काढा, हा जिहाद आहे. ज्यूंना जिवंत ठेवू नका अशा घोषणा दिल्या. त्यामुळे ईस्त्राइलला आपले अस्तित्व टिकवून धरण्यासाठी संघर्ष करणे अपरिहार्य ठरले. - ते सर्व ''एक्झोडस'' मध्ये मुळातूनच वाचणे इष्ट !

पृष्ठे : ६५६ किंमत :४४० रु. सभासदांना : ३३० रु. पोस्टेज : २५ रु.

◆ जून २००३
◆ वर्ष तिसरे
◆ अंक सहावा

मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

संपादकीय - २

साहित्यवार्ता ४

श्रद्धांजली १७

पुस्तक परिचय

सेव्हिंग फेथ : अनु. : माधव कर्वे २०

धर्मयुद्ध : रविंद्र ठाकूर २५

एक्झोडस् : अनु. : बाळ भागवत ३३

बालनगरी ४०

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
मेहता पब्लिशिंग हाऊस

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com

वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.